UNIVERSAL
LIBRARY
OU_192332
UNIVERSAL
LIBRARY

# फुलें वाहण्यापूर्वी—

लेखकाच्या

“ माझीं फुलें गुच्छ २ रा ”

या आगामी पुस्तकाच्या प्रस्तावनेचा कच्चा खर्डा

लेखक

श्री. वा. गाडगीळ

१९३६

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

CHECKED 1956

पुणें, पेठ भांबुर्डा, घ. नं. ९३६।३ येथें आर्यभूषण छापखान्यांत
रा. रा. अनंत विनायक पटवर्धन, बी. ए. यांनीं छापिलें व
श्री. ग. वा. गाडगीळ, बी. ए., संचालक, सुभग-साडी-भांडार,
मोअझ्झमजाही रोड, यांनीं हैद्राबाद दक्षिण येथें
प्रसिद्ध केलें.

# फुलें वाहण्यापूर्वी—

“ माझीं फुलें ” या माझ्या पुस्तकाचा २ रा गुच्छ प्रसिद्ध करतेवेळी माझ्या मनास एक प्रकारचा अत्युच्च असा सात्त्विक आनंद होत आहे. पहिला गुच्छ प्रसिद्ध होऊन आज सुमारें आठ वर्षें झाली. त्या मानानें पाहतां, हा २ रा गुच्छ उशिरांच प्रसिद्ध होत आहे. त्यास अनेक कारणें आहेत. त्यांपैकीं प्रमुख कारण म्हणजे, छपाईस लागणाऱ्या पैशाची तरतूद मजकडून आतांपर्यंत होऊं शकली नाही. पुस्तक-प्रकाशन, आणि त्यांतून कवितांच्या पुस्तकाचें प्रकाशन करणें, म्हणजे पैशाचा व्यय बुडित खातीं करण्यासारखेंच आहे! परंतु, आर्थिक दृष्ट्या या व्यापारांत कांहींच फायदा होत नसला तरी, या व्यापारानें एक प्रकारचा अत्युच्च आनंद चाखतां येतो, असा प्रत्यक्ष अनुभव मला माझ्या या पुस्तकाच्या १ ल्या गुच्छाच्या प्रसिद्धीचे वेळीं व नंतर आला, आणि म्हणून मी हा आतां २ रा गुच्छ प्रसिद्ध करीत आहें.

बुडित खातीं खर्च करण्याचे अनेक प्रकार आहेत. नित्योपयोगी नसणाऱ्या भरजरी तलम वस्त्रांची व हिरे-माणकांची खरेदी, हा एक त्यांतलाच प्रकार आहे. असे अनेक प्रकार सांगतां येतील. बुडित खातीं खर्च हा आपण प्रायः करीतच असतों; कारण हा सुसंस्कृत मानवाचा स्वभावच आहे. नित्य लागणारी गरज भागविण्याशिवाय नैमित्तिक हौशीही मानव उत्पन्न करीत असतो आणि भागवीत असतो. असल्या हौशी भागविण्यांतच त्याला जीवितांत खुमारी वाटते! नवनवोन्मुखता हें याचें कारण आहे. किंबहुना, समाजप्रिय मनुष्याचा हा स्वभावच आहे, असें म्हटल्यास चालेल. आणि म्हणूनच, कोणी संगीतासाठीं, कोणी चित्रकलेसाठीं, कोणी शिल्पकलेसाठीं,

तर कोणी सारस्वतनिर्मितीसाठी, स्वतांस व इतरांस आनंद व्हावा म्हणून, प्रसंगी तनमनाची झिज सोसूनही पाण्यासारखा पैसा खर्च करीत असतो.

बुद्धि खानी खर्च करावयास लावणाऱ्या असल्या वाढत्या गरजा आणि वाढत्या हौशी, यांचे पोटींच सर्व ललितेतर आणि ललितकलांची उत्पत्ति होत असते, असें आपणांस जागतिक संस्कृतीच्या विकासाचे अभ्यासावरून आढळून येईल. गरजेमुळें शोध लागतात ( नेसेसिटी इज दि मदर ऑफ इन्व्हेन्शन ) या म्हणण्याचा अर्थही हाच. तात्पर्य, मनुष्यानें आपल्या गरजा व हौशी वाढवीत जाव्यात, आणि त्या भागविण्याचा प्रयत्न सतत करीत जावा यांत व्यक्तींच्या आणि पर्यायानें समाजाच्या समुन्नतीचें बीज आहे. याच विचारसरणीस अनुसरून मी हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा बुद्धित व्यापार करीत आहें.

माझ्या आर्थिक परिस्थितीचा विचार करतां, हा व्यापार मला नुकसान करणारा आहे, हें लपविण्याचें कारण नाही. माझें नुकसान, अर्थात् मुद्रक, कंपॉझिटर, कागद विकणारे इत्यादि अनेकांचा कांही अंशी फायदा, हें उघड आहे. स्वतः झिज सोसून लोकांचें थोडें फार कल्याण करीत जावें, हें श्रेयस्कर असतें, म्हणून हें पुस्तक मी प्रसिद्ध करीत आहें, असें मला म्हणतां येईल.

" या कालांत कवितांचे पुस्तकांना विचारतो कोण ! पुस्तकांचे गठ्ठे शेवटीं कसरीचे भक्ष्यस्थानीं पडतील ! " असेंही कोणी मला म्हणतील. गोष्ट खरी आहे. परंतु, शेजारीं वावरणाऱ्या बुद्ध व जैन धर्मांचा थोडा फार बरा वाईट परिणाम माझे हिंदु मनावर झाला असल्यामुळें, मुंग्यांना नियमानें साखर घालण्याच्या पुण्यकृत्याप्रमाणेंच, मला हें कसरीला भक्ष्य घालण्याचें पुण्यकृत्य करावेंसें वाटतें !

अहिंसेंत तर पुण्य आहेच, पण नवीन सृष्टि निर्माण करण्याचे पुण्यांत अहंविशेष आहे ! हें पुस्तक प्रसिद्ध करणें म्हणजे नवीन सृष्टि निर्माण करण्या सारखेंच आहे. शिवाय हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर कांहीं नवीन टीकाकारही

पुढें येणारच ! वाभाडे काढणारे टीकाकार कां असेनात, पण त्यांना पुढें आणण्यास पर्यायानें हें पुस्तक कारण होणार, म्हणूनही मला आनंद होत आहे ! प्रसंगविशेषी वाभाडे काढणें हा टीकाकारांचा जन्मसिद्ध हक्कच आहे.

" पुस्तकाचा कांहींच उपयोग नाही ! " असें कांही व्यावहारिक दृष्टीचे लोक मला म्हणतील असा संभव आहे. त्यांना मला हेंच सांगावयाचें आहे कीं, " योजकस्तत्र दुर्लभः " विश्वांतील प्रत्येक वस्तूंत हेतु आहे; प्रत्येक वस्तूचा उपयोग आहे; उपयोग करून घेणारा मात्र पाहिजे !

" आम्हांस या पुस्तकापासून कांहिंच आनंद होत नाहीं " असें कांही गद्य-लेखक कदाचित् प्रतिपादितील तर " गुणी गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुणः ", असें मला त्यांना उत्तर देतां येईल.

प्रसिद्ध झालेलें प्रत्येक पुस्तक वाचकास आवडलेंच पाहिजे, असा आग्रह लेखकास जसा धरता येणार नाहीं, त्याचप्रमाणें आम्हांला आवडणारेंच पुस्तक लेखकानें प्रसिद्ध केलें पाहिजे, असा दुराग्रह वाचकासही धरतां येणार नाहीं. जगांत रुचिवैचित्र्य आहे आणि आवड ही नेहमीच सापेक्ष नशीच वस्तुनिष्ठ व आत्मनिष्ठही असूं शकते. शिवाय, उक्तिस्वातंत्र्य हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे. या हक्कास अडथळा कोणासही करतां येणार नाही.

घर बांधलें की शिष्टांबरोबर घुशीही कधीं कधीं घरांत येणारच ! घुशींनीं बिळें करणें हा त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे. पण म्हणून, घर बांधण्याचें लोकांनीं थोडेंच सोडून दिलें आहे !

नको असणाऱ्या गोष्टी जगांत कितीतरी असतात. म्हणून, त्या साऱ्या नाहींतशा थोड्याच करावयाच्या असतात ! किंवा, त्या उत्पन्न होऊं नयेत, असेंही आपणांस थोडेंच म्हणतां येईल !

मोठ्या बुद्धिवाद्यास व जातिवंत/आणि निष्णात अशा शास्त्रज्ञास साजेल असा उपयुक्ततेचा गंभीर आव आणून, एखादा विचारील कीं, "या सर्व

लिखाणाचा तर्कदृष्ट्या काय उपयोग आहे ?" त्याला उत्तर हेंच की, ईन्स्टीन, नोबेल, सर पी. सी. रॉय हे शास्त्रज्ञ देखील असल्या तऱ्हेच्या लिखाणावर लुब्ध झालेले आपणांस दिसून येतात. याविषयीं नवल वाळगण्याचें कारण नाही. मनुष्य सारख्या प्रमाणांत बुद्धिप्रधान व भावनाशलि असूं शकतो. म्हणजे, शास्त्रांची व कलांची आवड एखाद्याला सारखीच असूं शकते. कारण, मनुष्याच्या बुद्धीचा व भावनांचा विकास एकसमयावच्छेदें होऊं शकतो. किंबहुना, बुद्धि आणि भावना या एकाच ज्ञानग्रहणक्षम अशा मनाच्या निर-निराळ्या अवस्था आहेत, असें म्हणतां येईल. आज जें केवळ बुद्धिग्राह्य आहे, तें कालांतरानें भावनांच्या कक्षेंत येऊं शकतें. चिकित्सक मनास बुद्धिप्रधान म्हणावें, तर श्रद्धाळु मनास भावनाप्रधान मानावें. विवाहसंस्था ज्यावेळी श्वेतकेतूनें स्थापन केली, तेव्हां विवाह-पावित्र्य हा बुद्धिग्राह्य विषय होता; परंतु कालांतरानें विवाहपावित्र्य हें भावनांच्या कक्षेंत गेलें. दोन आणि दोन चार, हें समजण्यास बालमनास बरीच बुद्धि चालवावी लागते, परंतु पुढें तेंच मन परिणत झाल्यानंतर दोन आणि दोन चार या गोष्टीविषयीं खल न करतां, श्रद्धेच्या कक्षेंत तिची वाट लाऊन देतें. देशप्रेमाच्या कल्पनेसंबंधीं देखील असेंच म्हणतां येईल. म्हणजे, ४०।५० वर्षांपूर्वी, देशप्रेम हा बुद्धिग्राह्य विषय होता; तसा तो आज उरला नसून, देशप्रेमास आतां भावनेचें स्वरूप प्राप्त झालें आहे. मनाच्या या भावनात्मकतेवरच सौंदर्यदृष्टीचें अधिष्ठान अवलंबून आहे. इंद्रधनुष्य, उषा आणि संध्या, पूर्णचंद्र इत्यादींचें सौंदर्य आकलन होण्यास एक प्रकारची भावनानुकूलताच कारणीभूत असते. मात्र, असली दृष्टि चिकित्सकतेच्या आड नेहमींच येते, असें म्हणतां येणार नाही.

असो. या पुस्तकाकडे कोणी देखील न पाहण्याचा संभव गृहीत धरावयास पाहिजे. तरी देखील, पुस्तक प्रसिद्ध करण्यापासून पराङ्मुख होण्याचें मला कांहीच कारण दिसत नाहीं. ग्रेनें म्हटलेंच आहे:—

"Full many a flower is born to blush unseen
And waste its sweetness on the desert air."

पुस्तक प्रसिद्ध करण्यासंबंधीं नास्तिपक्षीं हा विचार झाला. आतां अस्तिपक्षीं थोडासा विचार करतों.

गुच्छ १ ला प्रसिद्ध झाला कीं, गुच्छ २ रा प्रसिद्ध झालाच पाहिजे. मग पुढें ३ रा न झाला तरी चालेल. कारण, गुच्छ १ ला म्हटला कीं, २ रा गुच्छ प्रसिद्ध करण्याचें बंधन स्वयमेव बांधलें जातें.

आपण आपले काढलेले सर्व फोटो ज्याप्रमाणें फ्रेम करून व्यवस्थितपणें ठेवीत असतों, त्याचप्रमाणें आपल्या अंतर्मनावर उमटणाऱ्या विविध अनुभवांचे, अवलोकितांचे, आकांक्षांचे, विचारांचे व भावनांचे शब्दमय फोटो आल्बम-मध्यें व्यवस्थितपणें ठेवणें योग्य असतें. किंबहुना, आपल्या कांहीं गीतांचें, शक्य असल्यास ध्वनिलेखनही करून ठेवणें या काळांत युक्तच ठरेल, असें मला वाटतें. आणि म्हणूनच हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास मी प्रवृत्त झालों.

शिवाय, कविता प्रसिद्ध करणें म्हणजे भावी काळच्या संशोधकास मदत करण्यासारखें आहे. स्वता संशोधन करणें चांगलें, परंतु तें करतां न आल्यास भावी काळच्या संशोधकांस तरी मदतीचें साधन किमानपक्षीं निर्माण करून ठेवावें.

माझी फुलें गुच्छ १ ला, या माझ्या पुस्तकास दक्षिणा प्रैझ कमिटी पुणें, व इंदूर ग्रंथोत्तेजक मंडळ या संस्थांनीं पारितोषिकें दिली, व तें मुंबई व वऱ्हाड मध्यप्रांत मध्यें शाळांतील वाचनालयांसाठींही सरकारनें मंजूर केलें, शिवाय केसरी, नवाकाळ, महाराष्ट्र, रत्नाकार, विद्यासेवक, Bombay Chronicle, मुमुक्षु इ. नियतकालिकांनीही उत्तेजक अभिप्राय दिले. बृहन्महाराष्ट्रांतील कांहीं रसिकांनींही पत्रें वगैरे पाठवून कवितेबद्दल आपला आनंद व्यक्त केला. त्या रसिकांपैकीं कांहींचीं नांवें खालीं देत आहें. येथील कै. न्या. मू. केशवराव कोरटकर, कै. ह. बा. अत्रे, बी. ए.; श्री. दा. चिं. भोगले, बी. ए., बी. टी. तसेंच बडोद्याचे प्रो. चिं. वि. जोशी व राजकवि चंद्रशेखर, कै. बा. अ. भिडे, बी. ए.; कवि टेंभुर्णीकर, डॉ. केतकर, कवियित्री सौ. मनोरमाबाई नावलेकर, सौ. शांताबाई भिडे, बी. ए.; कै. श्री. रु. कोल्हटकर, पं. श्री. दा. सातवळेकर, श्रीमंत

सरदार माधवराव साहेब किबे, ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, इ. शिवाय, हुबळी येथील टिळक ग्रंथसंग्रहालय व ठाणें येथील मराठी ग्रंथ-संग्रहालय या संस्थांनीं पुस्तक आपण होऊन मागवून घेतलें. आणि म्हणूनच १ ल्या गुच्छाप्रमाणेंच हा २ रा गुच्छही तज्ज्ञांस आवडेल, अशा आशेनें प्रेरित होऊन मी तो प्रसिद्ध करीत आहें.

इतकें विवेचन वाचून देखील या पुस्तकाचें वैयर्थ्य एखादा 'वकील' सिद्ध करूं शकेल. कारण, प्रत्येक प्रश्नास अनेक बाजू असूं शकतात. आणि सत्य-ज्ञानांतील गुणात्मकतेची प्रचीति बरीचशी सापेक्ष, म्हणजे पाहणाऱ्याच्या दृष्टिकोणावर अवलंबून असते. दोन आणि दोन चार, हें चटकन ध्यानांत येऊं शकतें; परंतु, वस्तू-वस्तूंतील माधुरीचें परिमाण व मूल्य इतकें चटकन ध्यानांत येऊं शकत नाही. कवितेसारख्या अत्यंत तरल अशा विषयासंबंधी तर विचारावयासच नको. आणि म्हणूनच, "दधि मधुरं, मधु मधुरं, द्राक्षा मधुरा, सुधापि मधुरैव" अशा तऱ्हेचे संदेह मनांत उत्पन्न होऊं शकतात.

पहिल्या गुच्छांतील व या दुसऱ्या गुच्छांतील कविता भावगीत ( Subjective Poetry ) या सदरांत पडणाऱ्या आहेत. भावगीत या प्रकारांत कवि आपल्या स्वतःच्या भावनांचीं अगर विचारांचीं शब्दचित्रें रंगवीत असतो. आणि तीं एकप्रकारें आत्मचरित्रपर असतात. म्हणून भावगीतांची खरी खुमारी कळण्यास कवीविषयीं थोडी तरी ओळख रसिकांना असणें जरूरीचें असतें. ती ओळख येथें थोडक्यांत करून देत आहें.

सुमारें ३८ वर्षांपूर्वीं माझा जन्म मोंगलाईतील देगलूर या खेडयांत झाला. हें गांव नांदेड जिल्ह्यांत आहे. या खेड्याचा व माझा संबंध फक्त जन्मस्थळा-पुरताच असून, माझें बहुतेक आयुष्य येथेंच ( म्हणजे हैद्राबाद दक्षिण येथें ) व्यतीत झालें. आमच्या ५ पिढ्या देशावर गेल्या, आणि त्यांतल्या शेवटल्या तीन मोंगलाईंत ! यामुळें मी जवळ जवळ नांवचाच कोंकणस्थ उरलों आहें. व देशस्थी दिलदारपणा, भाबडेपणा आणि सरळपणा हा माझ्यांत बऱ्याच

प्रमाणात शिरला आहे. असावें तितकें उर्दूचें ज्ञान नाहीं, म्हणून मी पक्का मोंगलाई, असें म्हणून घेण्यास मात्र अद्यापि अपात्र आहें.

मोंगलाईतील प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षणांत माझे लहानपणीं इंग्रजी भाषेला बरेंच महत्त्व असे. ( आतां तें महत्त्व उर्दूनें मिळविलें आहे. ) शिवाय, शॉक्रॉस, स्टर्ज, डुरँड, डॉ. किंग, प्रो. लागू इत्यादि, विद्यार्थ्यांसंबंधी कळकळ बाळगणाऱ्या, इंग्रजी भाषेच्या अध्यापकांचें अध्यापन मला लाभलें म्हणून, इंग्रजी भाषेवर माझें फार प्रेम आहे. तिच्याशी गद्यांत व पद्यांतही कधी कधीं गुजगोष्टी करणें मला फार आवडतें.

माझा जन्म मोंगलाईतील एका कट्टर सनातनी घराण्यांत झालेला असून, अत्यंत कर्मनिष्ठ, स्नानसंध्याशील, संस्कृतज्ञ, वेदांतशास्त्रज्ञ, धर्माभिमानी, शुद्धा-चरणी, असे असलेले माझे पितामह. ती. स्व. कै. दामोदर विष्णु ऊर्फ बापू-साहेब गाडगीळ यांचे निकट सान्निध्यांत माझ्या बालपणाचें १६ वर्षांपर्यंतचें आयुष्य गेलें. व या कालांत, संध्या, ब्रह्मयज्ञ, पुरुषसूक्त, अथर्वशीर्ष, रुद्र, श्रीसूक्त, वैश्वदेव, पूजा इ० सर्व मी त्यांचे जवळ उत्तम प्रकारें शिकलों. माझे आजोबा आध्यात्मिक दृष्ट्या, फारच अधिकारसंपन्न होते आदर्श गृहस्थाश्रमी, आदर्श गुरु, आदर्श ज्ञानी, असें आपलें दीर्घ आयुष्य स्वकर्तबगारीनें कंठून, ते वयाचे ८१ वें वर्षी नुकतेच कैलासवासी झाले ! त्यांना जनकराजाचीच उपमा शोभूं शकेल. ज्ञान, कर्म आणि उपासना मार्गांत त्यांची गति सारखीच होती. त्यांचे संबंधीं मला जें वाटतें, तें मीं खालील ओंव्यांत ग्रथित केलें आहे.

**अहो, ते सत्पुरुष धन्य । त्रिलोकांसही सन्मान्य**
**कोणी नस त्यांसम अन्य । पितामह माझे !**
**प्रपंच, तैसा परमार्थही । तयांनीं साधिला लवलाही**
**जगतीं नुरला कोणताही । अर्थ साधण्याचा**
**सर्वचि तयांचें अनिंद्य । ते जनां सर्वदाही वंद्य**
**त्यांचिया संगें बुद्धिमांद्य । उरलें नाहीं कदाही ।**

ओजस्वी गद्य लिहिणारे, मोंगलाईंतील सुप्रसिद्ध साहित्यसेवक ती. वामन दामोदर ऊर्फ दादासाहेब गाडगीळ, " वाङ्मयांतील खुसखुशीत मेवा " या पुस्तकाचे जनक, माझे तीर्थरूप आहेत. अर्थात्, टाकठिकीच्या, व्याकरणशुद्ध व चोखंदळ अशा शब्दरचनेचें प्रेम मला आनुवंशिक असें लाभलें आहे.

माझे पितृव्य, ती. स्व. महादेव दामोदर ऊर्फ बाबासाहेब गाडगीळ, बी. ए. एल. सी. ई. यांचेपासून मीं तत्त्वनिष्ठा व ध्येयप्रेम उचललें.

वयाच्या १६ वर्षांपर्यंत मी अत्यंत खेळकर होतों. पण १६ ते २४ वर्षे पर्यंत मी गंभीर व अंतर्मुख असा राहिलों. आणि मनाची विमनस्कता पुष्कळ अनुभविली. यास अनेक कारणें झालीं. त्यांतील मुख्य म्हणजे शारीरिक अस्वास्थ्य व लौकिक अपयशाच्या बाऊमुळें वाटणारें मानसिक अस्वास्थ्य असा नैराश्याचा दुहेरी काच मला १६ ते २४ वर्षेपर्यंत अनुभवावा लागला. तोडगा म्हणून, या काळांत मीं दासबोध, गीतारहस्य व तुकारामाचा गाथा, हे ग्रंथराज स्वयंप्रेरणेनें व मन लावून अभ्यासिले; आणि पुष्कळ मानसिक शांति मिळविली. माझ्या कवितेचाही उगम १६ वे वर्षीच झाला व तिनेंही मनाला बरीच शांति दिली. आणि २४ वे वर्षी नोकरी लागल्यानंतरचा काल तर बराच समाधानकारक गेला.

काव्यरत्नावलीत प्रसिद्ध झालेल्या माझ्या आत्मचरित्रांतील कांही परिच्छेद वाचकांस उपयुक्त होतील म्हणून ते खाली देत आहे.

१९१७ पासून माझें आयुष्य–नाटकांतील आनंदपर्यवसायी अंक संपून दुःखपर्यवसायी अंकास सुरुवात झाली व तेव्हांपासून १९२३ पर्यंत अनेक तऱ्हेची दुःखपरंपरा मी अनुभविली. या कालांत लौकिकदृष्ट्या माझी अनेक मार्गांनीं हानि झाली. परंतु, अध्यात्मदृष्ट्या हा काल माझा अत्यंत महत्त्वाचा होता, यांत मुळीच संशय नाहीं. दुःखोपभोगांमुळें अकालीं शहाणपण येतें, हे खरेंच आहे. जगाकडे डोळस दृष्टीनें पाहण्याची संवय याच उत्क्रांतीच्या काळांत जडली. अंतर्मुख दृष्टि याच काळांत झाली. आपण कोण

जग काय आहे, ईश्वर कसा असावा वगैरे जिज्ञासा याच कालांत उत्पन्न झाली. सारांश, "विपदः संतु नः शश्वत्तास्तु संकीर्त्यते हरिः" या कुंतीच्या मागण्यांत पुष्कळच शहाणपण सांठविलेलें आहे, हें मला आढळून आलें. एकुलकोंडा, विचारी व वैराग्यशील स्वभाव माझा या कालांत बनला. मनामध्यें वैराग्य वारंवार खेळूं लागलें. जो मी लहानपणी अत्यंत खेळकर होतों, तो मी दुर्मुखलेला झालों, व बोलणें एकदम कमी झालें. परंतु कवितेचा उगमही याच कालांत होऊन, तिच्या सहवासाची व सेवेची गोडीही पण याच कालांत लागली.

स्वभाव अत्यंत मानी व महत्त्वाकांक्षी असल्यामुळें या सान्या लौकिक अपयशाला पायाखालीं तुडवून, कांहीं तरी अलौकिक करावें असें मनास वारंवार वाटूं लागलें. त्यांतून जगाकडून होत असलेल्या अवहेलनेचे आघात हळुवार झालेल्या मनास मुळीच सहन होईनात! जगाचेंही वाजवीच होतें. कारण, माझ्या हीनदीन दुबळेपणापासून त्याला कांहीच फायदा होऊं शकला नसता.

अंतःकरणाशिवाय काव्याचा उगम होणें शक्य नाही. भावनाशील स्वभाव मला माझ्या मातेकडून मिळाला, अगर वडिलांकडून मिळाला, याचा निर्णय करणें कठीण आहे. कारण, माझी माता व माझा पिता यांचा दोघांचाही स्वभाव भावनाशील आहे, असें मला वाटतें. जास्त भावनाशील स्वभाव कदाचित् माझ्या वडिलांचाच असावा. पण पुरुष जातीस पुढें अनुभवानें व पोक्तपणानें भावनांना विचारांच्या कह्यांत ठेवण्याची संवय लागते, व त्यामुळें पुरुष जातीचा स्वभाव कमी भावनाशील दिसतो. अर्थातच वडिलांपेक्षां माझी आईच जास्त भावनाशील दिसते. माझे आईबाप भावनाशील नसते, तर कदाचित् मला काव्यप्रेम जडलेंही नसतें. गुणांच्या आनुवंशिकतेवर माझा थोडा विश्वास आहे आणि म्हणूनच मी म्हटलें आहे कीः—

( ओंवी )

**माझ्या कविमनाची ठेवण। मज लाभे मातेकडुन**
**पित्याचेंही विदग्ध मन। दुग्धीं ही शर्करा!**

'कित्ता

माझा स्वभाव प्रामुख्यानें मूलग्राही, तत्त्वजिज्ञासु व प्राप्त विषयांतील मर्माशी शीघ्रतेनें समरस व तन्मय होणारा असा आहे. मात्र, मी भावनाप्रधान असलों तरी, माझ्या कल्पनाशक्तीचा विकास फारसा झालेला नाहीं. परंतु, मन अत्यंत हळुवार, आत्मनिष्ठ, अंतर्मुख व स्वतांचे भावनाविचारांतच प्रायः रमून जाणारें असल्यामुळें, भावगीताकडे ( Subjective Poetry ) तें सहज वळलें. आणि १६ ते ३२ या वयांत कविता, अर्थात् भावगीतनिर्मितीशिवाय मला कशांतच उत्कृष्ट आनंद वाटेनासा झाला. व्यक्तित्वविकासास केवळ काव्यच पोषक असतें, असें अलीकडे मात्र वाटेनासें झालें आहे, आणि हें उत्क्रांति तत्त्वास अनुसरूनच आहे.

स्वभावांतील वैगुण्य सांगावयाचें म्हणजे मी अत्यंत अभिमानी व महत्त्वाकांक्षी असलों तरी, एकंदरींत स्थितिनिष्ठ, एककल्ली, भिडस्त, मितभाषी व मूलतः एकांतप्रिय असाच आहें. इच्छाशक्ति किंचित् दुबळी आणि अकारण हुरहुर वाटून घेण्याचा स्वभाव जास्त त्यामुळें, अहंगंडाचे ऐवजी माझ्या मनांत लौकिक बाबतींत एक प्रकारचा न्यूनगंड व लघुत्वभावच उत्पन्न झालेला आहे.

शिवाय, बुद्धिवान् मनुष्य निर्दय असलाच पाहिजे, व कोमल मनाचा मनुष्य बुद्धिहीन असलाच पाहिजे, अशी समजूत असणाऱ्या कांहीं बुद्धिहीन व निर्दय माणसांशीं माझा संबंध आला, त्याचाही बरा वाईट परिणाम माझे स्वभावावर झाला आहे. मात्र, याची भरपाई मानसिक व अध्यात्मिक बाबतींत असलेल्या माझ्या किंचित्शा अहंगंडानें केली आहे.

तसेंच, वस्तुनिष्ठेपेक्षां माझ्यांत ध्येयनिष्ठा व तात्त्विक दृष्टि अधिक आहे. अशा स्वभावामुळें, सुखाच्या अनुभूतीपेक्षां, दुःखाच्या संवेदनेची पकड माझे मनावर अधिक बळकट असते. शिवाय, गणितांतील सिद्धांताप्रमाणें त्रिकालाबाधित निर्दोषता मानवी स्वभावांत हुडकून, स्वतांच्या व लोकांच्याही स्वभावांतील दोष पाहून खिन्न होण्याची मला खोड आहे. जीवनशास्त्र आणि गणित यांत जमीनअस्मानाचा फरक आहे, हें मला कळतें, पण वळत नाहीं! त्याचप्रमाणें प्रतिकूल झालेल्या गोष्टी मी वर्षानुवर्षे उराशी बाळगून ठेवीत असतों. म्हणजे, अंतर्मनाची ( Subconscious mind) पकड माझे मनावर अधिक आहे.

१६ ते ३२ पर्यंत, मनाच्या कोमलतेमुळें मी आर्त जिज्ञासू व आर्त भक्त होतों. परंतु पुढें माझी श्रद्धा बरीच डळमळीत झाली व मनाची विमनस्कताही हळूं हळूं जात चालली. आणि आतां कवितेपेक्षां मानस-शास्त्र, सामाजिक प्रश्न यांकडेच माझ्या एकंदर मनाचा कल आहे.

तसेंच, ज्ञानप्राप्तींत संख्या आणि शब्द अथवा अंक आणि अक्षर यांचें महत्त्व सारखेंच आहे, असें मला पटून येत आहे. संख्येंत विवाक्षितता, तर शब्दांत विविधता अधिक असते. ज्ञानाचें संख्यात्मक प्रकटीकरण वैशिष्टयद्योतक तथापि अपूर्ण व एकांगीच असतें आणि त्याची परिपूर्ति शब्दात्मकतेशिवाय होऊं शकत नाही. तात्पर्य, गणित आणि तदवलंबित पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र, व जीवनशास्त्र व तदनुषंगिक मानसशास्त्र, समाजशास्त्र यांचे अवलोकनाशिवाय, ज्ञानदृष्टीस व्यापकता, विविधता, सूक्ष्मता, सखोलता, येऊं शकत नाही. आणि म्हणूनच, मूळचा मी संख्या प्रेमी असलों तरी नंतर विकासवादास अनुसरून, माझें शब्दप्रेम अधिक वाढत गेलें व जात आहे. परंतु, कविता-निर्मितीच्या कालांतील मनःस्थितीसंबंधींच विचार करणें प्रस्तुत असल्यामुळें, माझ्या मनःस्थितीच्या सध्यांच्या फेरबदलाविषयी विशेष लिहिण्याची येथें आवश्यकता नाहीं.

संसृति आणि नियतीमध्यें नियमबद्धता आहे, असें मी मानतों (The Universe is a cosmos ) परंतु, निसर्गांत विकासास आणि उत्क्रांतिक्षमतेस देखील पुष्कळ क्षेत्र आहे.

तसेंच, इंजिनियरिंग खात्यांतील हिशेबी कामाशीं माझा संबंध आज बारा वर्षे राहिल्यामुळें रचनेचा रेखीवपणा या गुणाविषयींची आवड 'माझ्या मनांत साहजिकच उत्पन्न झाली आहे, हें येथें नमूद करून ठेवावेंसें वाटतें. तथापि, माझ्यांतील समाजविषयक सहृदयतेची थोडीशी कुचंबणाही या खात्यांत झाली. आणि, मी जर डॉक्टर किंवा वकील असतों तर सारस्वतसेवादृष्ट्या माझा समाजास अधिक फायदा झाला असता, असें कधीं कधी मला वाटतें. परिस्थितीचें दास्य हें असें नडत असतें !

वर वर्णन केलेल्या माझ्या मनाच्या ठेवणीचा बरा वाईट परिणाम माझे काव्यावर झालेला आहे.

असो. कवि-जीविताच्या वैशिष्ट्याचें प्रतिबिंब भावगीत या काव्य-प्रकारांत हमखास पडत असतें, म्हणून स्वतांच्या मनाची रूपरेखा वर थोडक्यांत चित्रित केली. भावगीत हा सारस्वताचा एक प्रकार आहे त्यामुळें, आणि सारस्वतांत मानवी जीविताचें प्रतिबिंब उमटत असतें म्हणून, एकंदरीत मानवी जीवितासंबंधीच्या माझ्या कल्पना काय आहेत, त्या सांगणेंही आवश्यक आहे, म्हणून त्यासंबंधीं थोडक्यांत येथें विवेचन करून, ओघानेंच पुढें सारस्वत, भाषा, काळ, इ० संबंधीं चर्चा करणार आहें.

मनुष्यांत अत्यंत प्रबल अशी जर कोणती इच्छा असेल तर ती जगण्याची ! जगण्यासाठींच तो बरें वाईट कर्म करीत असतो, धडपड करीत असतो. या धडपडींत त्याला निसर्गाकडून व इतरांकडून कधीं साह्य होत असतें, तर कधीं विरोधही होत असतो. हे विरोध शक्य तितके कमी व्हावेत, म्हणून तो अहर्निश ज्ञान मिळवीत असतो. तात्पर्य, या जगण्याच्या इच्छेमुळेंच, त्याच्या मनाचे इच्छामय, ज्ञानमय, व भावनामय व्यापार अत्यंत विकसित व अत्यंत संमिश्र असे गुंतागुंतीचे झाले आहेत. कर्म–ज्ञान–उपासना; आणि सुख, म्हणजे

अनुकूल संवेदनात्मक बाह्योपचार; समाधान म्हणजे मनाच्या समतेनें लाभणारी शांति आणि सौंदर्य इत्यादि विषयक कल्पनांची उत्पत्ति या मूळच्या मानसिक प्रवृत्तींच्या परिणतीचेंच फळ होय. झालेल्या ज्ञानाचें प्रकटीकरण करण्याचे दोन पर्याय आहेत. एक संख्यावाचक व दुसरा गुणवाचक. आणि म्हणूनच, अंक व शब्द यांचें महत्त्व मनुष्यास फार वाटतें. बाह्य निसर्गज्ञानाचें प्रकटीकरण सामान्यतः संख्यावाचक आहे, तर मानव आणि इतर जीवसृष्टिज्ञानाचें प्रकटीकरण गुणवाचक आहे. संख्यावाचक ज्ञानासंबंधीं मतभेदास वाव नसतो. उ० भौतिक व रसायन शास्त्रांतील सिद्धांत. परंतु, गुणवाचक ज्ञानासंबंधीं बराच मतभेद असूं शकतो. आणि म्हणूनच, भगवद्गीतेच्या संदेशाचे अर्थ ज्ञानयोग, कर्मयोग, संन्यासयोगपर असे अनेक लाविले जातात.

ज्ञाता, ज्ञेय, आणि ज्ञान यांचे परस्परसंबंध लक्ष्यांत घेतल्यास, आपणास मानवी मनाचें वैचित्र्य प्रत्ययास येईल. या वैचित्र्याचें कारण पाश्चात्य शास्त्रज्ञांस सुद्धां नीट उमजलेलें नाहीं. या वैचित्र्यांत, किती फाटे फुटूं शकतील हें ठरविणें कठीण आहे; कारण, अनेक जिज्ञासूंस एकाच स्थलकालीं एकाच ज्ञेय वस्तूचें जें ज्ञान होतें, त्यांत फरक असूं शकतो. तसेंच, एकाच जिज्ञासूस एकाच ज्ञेयवस्तूचे निरनिराळ्या स्थलकालीं होणाऱ्या ज्ञानांत फरक असूं शकतो. म्हणजे जिज्ञासूच्या दृष्टिकोणावरही ज्ञानाची महती अवलंबून आहे. तसेंच स्वतांला झालेलें ज्ञान, त्याचें प्रकटीकरण, आणि त्या प्रकटीकरणाचा श्रोत्यांचे अगर वाचकांचे मनावर होणारा परिणाम आणि त्यांनीं आकलन केलेलें ज्ञान यांतही फरक पडूं शकतो ! अतएव, जिज्ञासूचे व्यक्तित्वावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात, व्यक्तित्वाचें महत्त्व फार आहे. सर्व शास्त्रज्ञांत एखादाच ईन्स्टीन जन्मतो! तात्पर्य, निसर्गशक्तीपेक्षां मानसिकशक्ति अधिक गूढ आहेत आणि म्हणूनच, व्यक्ति तितक्या प्रकृति आपणांस आढळून येतात व मानवी जीवितासंबंधींच्या निरनिराळ्या स्थळी व निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या कल्पना असूं शकतात. मानवी जीविताचें विविधत्व इतकें संकीर्ण आहे कीं, आधुनिक आणि पुरातन, पाश्चात्य आणि पौर्वात्य, धार्मिक, राष्ट्रीय,

सामाजिक, वैयक्तिक इ. भेदांचा विचार करूनही साकल्यानें, सार्वकालीन आणि सार्वजनिक असें हिताचें तत्त्व शोधून काढणें मानवी मनास दुरापास्त आहे! तसेंच चांगलें व वाईट, खरें व खोटें इत्यादि द्वंद्वांविषयी निर्णय करणेंही कठीण असतें. तथापि तें अशक्य नसतें व यासंबंधी निवाडा करण्याचीं गमकें आहेत, हें मी ओघानेंच पुढें प्रतिपादणार आहें. तूर्त, मानवी जीवितासंबंधीच्या माझ्या कल्पना खालीं दिल्याप्रमाणें दिग्दर्शित करीत आहे.

भोग आणि त्याग, अथवा प्रवृत्ति आणि निवृत्ति व स्वातंत्र्य आणि बंधन या मानवी जीविताच्या चतुःसीमा आहेत, आणि अशा चतुःसीमांत कर्म करणें हा जीविताचा हेतु आहे. कर्म करण्याची प्रेरणा मानवी मन व बुद्धि करीत असते. आणि या मनाची व बुद्धीची शक्ति अपार व अतर्क्य आहे. तसेंच, आनुवंशिक संस्कार आणि परिस्थिति यांचाही बरा वाईट परिणाम मानवी मनावर, अर्थात् जीवितावर होत असतो. केलेली बरी वाईट क्रिया, घेतलेला बरावाईट वास, ऐकिलेलें सुंदर संगीत, अगर तप्त लोहासारखे हृदयास डोंचणारे जळजळीत शब्द, पाहिलेलें हृदयंगम दृश्य, अनुभविलेला प्रत्येक बरावाईट अनुभव, यांचे ठसे अंतर्मनावर कायमचे उमटलेले असतात. परिस्थितीशीं अहर्निश चालणाऱ्या लढ्यांतील यशापयशाचे बरेवाईट परिणामही अंतर्मनांत सांठविले जातात. भूतकाळांत आलेल्या बऱ्यावाईट अनुभवां-वरच मनुष्य वर्तमानकालांत भविष्यकालांतील आशांचे मनोरे बांधीत असतो. परंतु, वर्तमान हा इतका कांही क्षणभंगुर आहे कीं, पाहतां पाहतां तो भूत-कालांत विलीन होत असतो; इतकेंच नव्हे तर, आपल्या बरोबर भविष्यकाळासही ओढून नेत असतो! केलेले संकल्प, रचलेले बेत, ठरवलेल्या आकांक्षा व ध्येयें हीं बहुधां मनोराज्यांतच सुफल होत असतात. आणि मग, आशा आणि स्मृति यांशिवाय जवळ कांहींच रहात नाहीं!

पावसाळ्यांत कधीं कधीं पडणारें कोंवळें सुंदर उन्ह आणि इंद्रधनुष्य, अथवा उषेच्या आणि संध्येच्या गालांवरील सुंदर तांबूस रंग, हीं दृश्यें

पाहतां पाहतांच नाहीशीं होणारीं आहेत. त्याचप्रमाणें, मानवी जीवित, व विशेषतः त्यांतील आनंद क्षणभंगुर आहे, आणि त्याला कालापुढें हात टेकावे लागतात!

तथापि, कालावरही विजय मिळविण्याचें सामर्थ्य मानवी वाणीत आहे! राम, कृष्ण, बुद्ध, झोरास्टर, जीसस, ख्रिस्त, महंमद पैगंबर, शिवाजी, नेपोलियन यांचे जड देहांवर कालानें जरी आपला हात केव्हांच फिरविलेला आहे, तरी पण, या महान् विभूतींनीं व धुरंधुरांनीं मिळविलेलें यश वाणीच्या योगें चिरंजीव होऊन बसलें आहे! किंबहुना, नुसत्या वाणीच्या सेवेनेंही एकाद्यास चिरंजीव होतां येईल, हें वाल्मीकि, व्यास, कालिदास, ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, केशवसुत, गडकरी इत्यादि साहित्यसम्राटांचे उदाहरणांवरून दिसून येईल. मिळविलेल्या ज्ञानाची जपणूक आणि वाढ वाणीमुळें होत असते. वाणीचा–वाग्देवीचा वरदहस्त प्रतिभावानांचे मस्तकीं असतो, म्हणूनच ते कालौघांत तरतात आणि इतरांस तारतात; अर्थात् प्रतिभावानांचे आयुष्यांतील स्फूर्तीच्या सुवर्णक्षणकणांचें मोल कधीहि करतां येणार नाहीं!

मानवी अंतर्मनाच्या ऐश्वर्याचें सौंदर्य व निसर्गांतील अथवा विश्वांतील मूर्त आणि अमूर्त सौंदर्य हें कवि, म्हणजे सारस्वत सेवक आणि शास्त्रज्ञ आपआपल्या परीनें शोधून काढीत असतात. आणि त्या सौंदर्यास वाणीच्या साह्यानें अगर अन्य साधनांनीं पार्थिव रूपही देत असतात. मानवी मन व बुद्धि आणि निसर्ग यांतील गूढें सदांसाठींच उरलेलीं असतात; म्हणजे अज्ञात-भूत एका अर्थी जितका अनादि आहे, तितकेंच ज्ञेय-भविष्यही अनंत आहे. कालाचें ज्ञान केव्हांहि झालें तरी सापेक्षच असतें. मनाचे व्यापार ज्ञानमय, भावनामय, इच्छामय असे सामान्यतः असतात, हें मागें सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें निसर्गाचें स्वरूपही सत्य, शिव व सुंदर असें, स्थूलमानानें त्रिगुणात्मक असतें. सत्य जाणण्याकडे तत्त्ववेत्त्यांचा कल प्रामुख्यानें असतो. लोकोपयोगी, अर्थात् लोकांचें शिव करणारीं साधनें निर्माण करण्याची प्रवृत्ति

सामान्यतः भौतिक शास्त्रज्ञांची असते, तर मानवी अंतर्मनांतील व निसर्गांतील ऐश्वर्यांचे सौंदर्यास पार्थिव स्वरूप देण्याची खटपट ललितकलाकोविद नेहमीं करीत असतात. मात्र, हे व्यापार नेहमींच परस्परविरोधी असतात, असा ग्रह वाचकांनीं करून घेण्याचें कारण नाहीं. एकाच मनुष्यास तिन्हीही भूमिकांवरून निसर्गाचें अवलोकन आणि परीक्षण करतां येईल. आणि निसर्ग त्रिगुणात्मक असला किंवा भासला तरी, त्यांत एकपिंडता आहे. अतएव, सत्याच्या पूजेंत शिव व सौंदर्य यांची पायमल्ली होत असते; अथवा, शिव करण्यांत सत्य आणि सौंदर्य नेहमींच धाब्यावर बसविलें जातें; अथवा, सौंदर्याच्या उपासनेंत सत्याची व शिवाची नेहमींच गळचेपी होत असते, असें कोणी मानूं नये. तत्त्ववेत्ते, शास्त्रज्ञ व कलावंत यांच्या कृति एकसमयावच्छेदेंकरून सत्य-शिव-सौंदर्यमय असूं शकतात. पण, जो तो आपल्या निश्चित ध्येयावरच सर्व दृष्टि केंद्रित करून निसर्गाचीं इतर अंगें पार्श्वभागीं लोटीत असतो, इतकेंच. येथें हेंही सांगून ठेवावेंसें वाटतें कीं, जिज्ञासेचा आणि सौंदर्यदृष्टीचा उगम मूळ उपयुक्ततेसाठींच असला तरी, उत्क्रांति–तत्त्वानुरूप, पुढें आनंदासाठींच ज्ञान व सौंदर्य, किंबहुना, ज्ञानासाठींच ज्ञान व सौंदर्यासाठींच सौंदर्य असल्या कल्पना विकसित झाल्या, आणि भौतिक शास्त्रांप्रमाणेंच, तत्त्वज्ञान–अध्यात्म व ललितकलासौंदर्यशास्त्र ( Aesthetics ) विकसित झालें.

निसर्गाचें अथवा विश्वाचें स्वरूप भाव आणि अभावात्मक आहे. ज्ञेयाज्ञेय दृष्टादृष्ट, व्यक्ताव्यक्त, यांचें सुंदर संमिश्रण निसर्गांत असतें ! काल जसा एकाअर्थी अनादि, अनंत आणि अज्ञात आहे त्याचप्रमाणें अवकाश, अर्थात् निसर्ग देखील आहे. काल आणि अवकाश अथवा निसर्ग यांची जोडी अभेद्य आहे. म्हणजे कालाव्यतिरिक्त नुसत्या निसर्गाची, अथवा निसर्गाव्यतिरिक्त नुसत्या कालाची कल्पनाही करितां येत नाहीं. ईन्स्टीन इत्यादि भौतिक शास्त्रज्ञांचें म्हणणें तरी हेंच आहे.

सारांश, सापेक्षत्वाच्या पलीकडील म्हणजे अनाद्यंतरहित, निर्गुण, निराकार, व सर्वतंत्र-स्वतंत्र अमर्याद, अविनाशी, केवलानंदमय, आणि चैतन्ययुक्त अशा परतत्त्वाच्या सम्यग्ज्ञानासंबंधींची तळमळ मानवी मनास नेहमीं लागलेली असते. आणि, प्रतिभेच्या साह्यानें त्यास परतत्त्वाची प्रचीति मधून मधून होत असते. मानवी मन उत्क्रांतिप्रवण, उन्नतिप्रवण, उत्कर्षप्रवण आहे. आणि त्याची जसजशी उन्नति होत असते, तसतशी त्याची सर्वतंत्र-स्वतंत्रतेविषयींची आवडही वाढूं लागते. आणि विचार आणि कृति या दोन साधनांनीं तो आपली उत्क्रांतिप्रवणता, उत्कर्षप्रवणता प्रकट करीत असतो. मानवी जीवित म्हणजे मानवी, जड, नश्वर आणि मर्यादित देहांत कोंडलेल्या सच्चिदानंदमय परतत्त्वाची, मूळच्या अनिर्बंध अविनाशी अशा अवस्थेप्रत पोहोंचण्याची अहंकारयुक्त ज्ञात्याची धडपड आहे, असें म्हणतां येईल. किंबहुना, ज्ञाताही तोच, ज्ञेयही तेंच व ज्ञानही तेंच, असें हें एक न सुटणारें त्रांगडें आहे! मॅटर आणि एनर्जी ही एकच आहेत, व हिंग व कोळसाच काय पण सर्व वस्तूंचे अंतर्यामी एकाच तऱ्हेचे विद्युत् अणु व रेणु ( protons and electrons ) असतात, असें भौतिकशास्त्रज्ञ वेदांतशास्त्रज्ञांप्रमाणेंच म्हणत असतात. सारांश, माया, ब्रह्म इत्यादि शब्द उपयोजूनही हें परतत्त्व शेवटीं अज्ञातच! मति कुंठित होऊन श्रुति-स्मृति जेथें नेऽति नेऽति म्हणूं लागल्या, तेथें सामान्य जनांचा काय पाड! म्हणून, जीविताची ही तत्त्वज्ञानकेंद्रित दृष्टि सोडणेंच प्रस्तुत उचित होय!

काल जसा भूतवर्तमानभविष्यात्मक आहे, त्याचप्रमाणें, निसर्गांतील एकंदर कार्यघटना उत्पत्तिस्थितिलयात्मक आहे. आणि मानव हा निसर्गाचा अत्यंत लाडका पुत्र असल्यामुळें, कार्यघटना ज्ञानग्रहणक्षमतेप्रमाणेंच, बुद्धिपुरस्सर कृतींचें आणि अर्थात् विचारांचें सार्वभौमत्वही त्याच्याकडेच आहे. पैकीं, कृतींचें क्षेत्र कांहींसें मर्यादित असतें. कारण, निसर्गावर सर्वस्वी व सर्वदा जय मिळविणें, हें कठीण आहे. परतत्त्वाचा जो अंश मानवी मनांत

प्रतिबिंबित झालेला असतो, त्यास पराजय पटत नाही. आणि, कृतींत पराजय मिळूं लागल्यास, विचारांची अधिक वाढ त्या प्रमाणांत होत असते, असें सामान्यतः म्हणावयास हरकत नाही. अतृप्त वासनांची व्यवस्था किंवा कांहीं तरी वासलात ही लागतच असते, असें मनोविश्लेषणशास्त्र म्हणतें. शक्तीचा नाश न होतां, तिचें रूपांतर होतें, असें भौतिकशास्त्रज्ञ म्हणतात. एक इंद्रिय विकल झाल्यास दुसरें इंद्रिय त्याच प्रमाणांत सबल बनतें, असें जीवनशास्त्र सांगतें.' 'What is lost materially is gained spiritually" या म्हणण्याचा अर्थही हाच आहे. तात्पर्य, विचारांचे वाढीच्या आड फारच कमी अडथळे येऊं शकतात. आणि या विचारांच्या वाढीची परिसीमा द्रष्टा बनण्यांत, आणि परतत्त्वाची प्रचीति होण्यांत असते. विचारांचें प्रकटीकरण वाणीच्या साह्यानें होत असतें. मग ती वाणी उक्त असो, किंवा लिखित असो. विचारांची परिसीमा गांठण्यांत आणि विचार बोलून दाखविण्यांत सुसंस्कृत मनास एक प्रकारचा अत्युच्च असा सात्त्विक आनंद होत असतो. काल आणि निसर्ग किंवा विश्व, अथवा एतत्संबंधी विषयांखेरिज विचारांचें दुसरें क्षेत्र असूं शकत नाहीं. मग ते विचार मानवाच्या अंतर्मनासंबंधी असोत अथवा बहिर्जगासंबंधी असोत. कारण, मानव तरी निसर्गाव्यतिरिक्त थोडाच आहे। डॉक्टर विल्यम रोज यांचे यासंबंधींचे विचार मननीय आहेत, म्हणून ते येथें उद्धृत करतों:—

"Man, in his present condition, represents a stage in an evolutionary process which is still going on, and all the efforts of scientists are ultimately directed towards the one end – to reveal the nature of man's existence and the universe of whose creative forces he is so far as we know, the crowning achievement."

आपलेकडील वेदांतशास्त्रज्ञ तरी हेंच सांगत असतात.

निसर्गज्ञान किंवा विश्वज्ञान हें सच्चिदानंदस्वरूपी आहे. विश्वाला जशी एका अर्थानें परिसीमा नाहीं, तशीच विश्वज्ञानालाही परिसीमा नाही. ज्ञानलाभाच्या सर्व क्रियांत जिज्ञासु मनुष्यांला अपूर्व चैतन्य आणि आनंद प्रत्ययास येत असतो, आणि या आनंदासही परिसीमा नसते. ज्ञानलाभाच्या व्यापारांत विचारांना फार महत्त्व आहे. विचारांच्या व्यापाराचे विषय अनेक असूं शकतात. अथवा, निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे मानवी मनाचें द्रष्टृत्व अनेक प्रकारचें असूं शकतें. ईन्स्टीनप्रमाणें अपेक्षावादासंबंधी सिद्धांत प्रस्थापित करण्यांत द्रष्टृत्व आहे. सर चंद्रशेखर रामनूप्रमाणें प्रकाशतत्त्वासंबंधी नवे शोध लावण्यांत द्रष्टृत्व, अथवा प्रतिभेचें संस्फुरण आहे. किंबहुना, नोबेलप्रमाणें स्फोटक द्रव्यें शोधून काढण्यांतही प्रतिभेचें संस्फुरण आहे. सारांश, विचारांच्या व्यापाराचे विषय भौतिक अगर रसायनशास्त्रासंबंधीं; अथवा, आत्मा, विश्व, परतत्त्व यासंबंधीं, म्हणजे तत्त्वज्ञानचर्चात्मक; अथवा, कृतीला प्रेरक ज्या भावना, कामना, वासना, मन, बुद्धि, अहंकार एतत्संबंधीं, म्हणजे मानसशास्त्रचिकित्सामय असूं शकतात.

असल्या शास्त्रीय विचारात्मक व्यापारांस अथवा तद्विषयक सिद्धांत शोधून काढण्यास जशी प्रतिभा लागते, तशीच प्रतिभा ललितकलाविलासासाठीं देखील लागत असते. " अपूर्ववस्तु निर्माणक्षमाप्रज्ञा " अशी प्रतिभेची व्याख्या गृहीत धरावयास हरकत नाही. प्रतिभेसंबंधीं पाश्चात्य कल्पनाही अशीच आहे. " Intellectual endowment of the highest kind, particularly the power of invention or of producing original combinations." असें genius म्हणजे प्रतिभेसंबंधीं त्यांचें मत आहे. ललितकलानिर्मितीमध्यें प्रतिभेचे व्यापार प्रामुख्यानें सौंदर्यदर्शक, सौंदर्योत्पादक, सौंदर्यपरिपोषक, अथवा सौंदर्यविषयक असतात. सौंदर्य हें आनंदोत्पादक असतें. वास्तविक तत्त्वज्ञान अथवा शास्त्रीय ज्ञान देखील आनंदोत्पादक असतें, तथापि, सौंदर्यापेक्षां सत्याला व उपयुक्ततेलाच या प्रांतांत अधिक

महत्त्व दिलें जातें. परंतु, ललितकलेमध्यें केवळ सत्याकडे, अथवा केवळ उपयुक्ततेकडे लक्ष न देतां, केवळ सौंदर्याकडेच प्रामुख्यानें लक्ष दिलें जातें. ललितेतर कलांची वाढही प्रामुख्यानें उपयुक्ततेसाठींच असते. परंतु, असले भेद परस्परविरोधी असतात, असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरी व कार्लाईलचें बरेंच लिखाण प्रामुख्यानें तत्त्वज्ञानप्रधान असलें तरी, त्यांतील बराच भाग काव्यमय, सौंदर्यमय, अतएव आनंदोत्पादक आहे. मॅक्झिम गोर्कीचें "मदर" व कुप्रिनचें "यामा" या पुस्तकांची सामाजिक दृष्ट्या उपयुक्तता असली तरी, कलादृष्ट्या तीं सुंदरही आहेत. त्याचप्रमाणें, उपयुक्ततेच्या दृष्टीनें महत्त्वाच्या, म्हणजे वाढत्या गतीच्या आणि त्याचबरोबर, वाढत्या दृश्य सौंदर्याच्या मोटारीही दिवसेंदिवस निघत आहेत. सारांश, सौंदर्य हें आनंदोत्पादक असतें, म्हणून तें सगळ्यांस, म्हणजे तत्त्वज्ञांस व उपयुक्ततावाद्यांसही हवेंहवेंसें वाटतें. उपयुक्ततेबरोबर सर्व दृष्टींनीं जीवित सुंदर करण्याकडे प्रागतिक मनुष्याची दृष्टि असते. किंबहुना, पोषाखाचें सौंदर्य, देहाचें सौंदर्य, बुद्धीचें सौंदर्य, मनाचें सौंदर्य, आत्म्याचें सौंदर्य, या सर्वांचा आस्वाद घेण्यास शिकणें, म्हणजे जीवित जगण्यास योग्यतम करणें होय, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

सुंदर वनश्री दिसल्यास, चित्रकार तिची प्रतिकृति चित्रफलकावर काढण्यास प्रवृत्त होईल. तर एखादा कवि म्हणजे सारस्वत-निर्माता तिचें वर्णन शब्दांनीं करील. एखादा वनस्पतिशास्त्रज्ञ झाडांच्या, पानांच्या, फुलांच्या व फळांच्या विविध प्रकारांसंबंधी विचार करील, तर एखादा व्यवहारज्ञ व्यापारी लांकूडफांट्यापासून किती उत्पन्न होऊं शकेल, याचा हिशेब करीत बसेल! सारांश, ज्याच्या त्याच्या परीनें ज्याला त्याला त्या वनश्रीपासून आनंद होईल, हें जरी खरें असलें, तरी निरपेक्ष व निरुपाधि असा आनंद फक्त चित्रकारास व कवीसच होईल!

उपयुक्ततेला गौणत्व देऊन, केवळ सौंदर्याचे महत्त्वास प्रामुख्य ज्या कलांत लाभत असतें, त्या कलास ललितकला म्हणतात, हें वर सांगितलेंच

आहे. ललितकलांचा दुसरा विशेष हा कीं, त्या निसर्गाच्या आनंदोत्पादक अशा प्रतिकृति असतात. नित्य बदलणाऱ्या निसर्गातील धांवतीं पण सुंदर दृश्यें, सुंदर व उदात्त विचार आणि भावना, ऐकिलेले हृदयंगम स्वरसंगम, इत्यादि रामणीयकांस शक्य तितकें पार्थिव व चिरजीवी स्वरूप प्राप्त करून देऊन, तज्जन्य आनंद पुनः पुनः उपभोगण्याची व्यवस्था ललितकला करीत असतात. निसर्गातील वास्तविक सौंदर्याची जपणूक करून, व उद्वेगजनक अशा घटनांतील दुःखें कल्पनासृष्टींतच कां असेनात, पण तीं घालवून, ललितकला मानवास प्रमुदित करीत असतात. बदलणारा काळ सौंदर्यस्थळेंही नाहींतशीं करीत असतो. पण ललितकला कांहीं मर्यादेपर्यंत कालावरही विजय मिळवीत असतात !

सर्व ललितकलांमध्यें काव्याचें स्थान पहिलें आहे. अशनिपातानें अगर भूकंपानें, एक वेळ ताजमहाल भंग पावेल, ( असें व्हावें अशी लेखकाची अर्थात् इच्छा नाही ! ) पण, रामायण चिरजीविच राहील, यासंबंधीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं. येथें काव्य हा शब्द सारस्वत अथवा ललितवाङ्मयप्रबंध म्हणजे कादंबरी, लघुकथा,नाटक इत्यादि गद्यात्मक अथवा महाकाव्य, खंडकाव्य, भावगीत इत्यादि पद्यात्मक प्रबंध अशा अत्यंत व्यापक अर्थानें उपयोजिला आहे. हे सर्व प्रकार रसोत्पादक, अतएव भावनात्मक प्रसंगावरच अधिष्ठित असतात, म्हणून वाङ्मयाचे या शाखेस स्थूलमानानें काव्य असें म्हणतां येईल आणि काव्येतर वाङ्मय म्हणजे शास्त्रीय वाङ्मय. यासंबंधींची पाश्चात्य विचारसरणीही अशीच आहे.

तत्त्वज्ञान, अध्यात्म, मानसशास्त्र आणि समाजशास्त्र या सारस्वताच्या चतुःसीमा आहेत, असें सामान्यतः म्हणण्यास हरकत नाहीं आणि व्यक्तिजीवन, समाजजीवन आणि मानवीजीवन त्यांत चित्रित केलें जातें.

शास्त्रीय वाङ्मय व सारस्वत यांमधील भेदासंबंधीं ऊहापोह करणें येथें प्रस्तुत आहे, म्हणून यासंबंधी थोडक्यांत विवेचन करतों. शास्त्रीय वाङ्मय हें

प्रामुख्यानें विचारप्रधान असतें. पण, सारस्वताची उभारणी भावनात्मकतेवर असते म्हणून, भावनांच्या वास्तव्याशिवाय, विहाराशिवाय, विलासाशिवाय त्यांत रसाची उत्पत्ति व उत्कर्ष होऊं शकत नाहीं. शास्त्रीय वाङ्मय हें normative आहे, म्हणून त्यामध्यें वैचित्र्यास वाव असूं शकत नाहीं. परंतु, सारस्वतांत कल्पनेस आणि वैचित्र्यास पुष्कळच वाव असतो. शास्त्रीय वाङ्मय असंदिग्ध, सरळ आणि सुटसुटीत शब्दांत ग्रथिलेलें असतें, तर सारस्वतांत वक्रोक्ति, व्यंग्योक्ति, लक्षणा, संदिग्धता, ध्वनि, गूढता, उपमा, उत्प्रेक्षा इत्यादींस पूर्ण वाव आहे. शास्त्रीय वाङ्मयांत लेखकांचें व्यक्तित्व मुळींच डोकावूं नये. परंतु, सारस्वतांतील वस्तुनिष्ठ प्रकारांत नसलें तरी, आत्मनिष्ठ प्रकारांत व्यक्तित्व जितकें डोकावेल, तितकें तें कलेच्या दृष्टीनें युक्तच होय. किंबहुना, सारस्वतांतील वस्तुनिष्ठता अथवा आत्मनिष्ठता, वास्तवता अथवा ध्येयता ही निर्मात्याच्या एकंदर व्यक्तित्वावर आणि दृष्टिकोणावरच अवलंबून असते; आणि म्हणूनच समकालीनांत देखील दासगणू व तांबे, ना. ह. आपटे व फडके, अथवा वा. म. जोशी, चिं. वि. जोशी, डॉ. केतकर, तसेंच न. चिं. केळकर इत्यादि नानाविध आणि त्याचप्रमाणें सव्यसाची विविधविषयक सारस्वत-निर्माते दिसून येतात. इतकेंच नव्हे तर, निरनिराळ्या काळांत व देशांतही एकाच प्रकारचे वाङ्मयसेवक पुष्कळ असूं शकतात.

असो. आतां सारस्वत अथवा ललित वाङ्मय याच्या प्रकारांसंबंधीं विहंगावलोकन करतों.

ललितवाङ्मयाच्या प्रकारांपैकीं नाटक हे प्रामुख्यानें दृश्यकाव्य आहे. आणि थोड्या-फार प्रमाणांत काव्येतर उर्वरित ललितकलांस, म्हणजे शिल्प, नृत्य, संगीत, चित्रकला इत्यादींस, नाटकाचे प्रयोगांत वावरण्यास स्थानही आहे, हें थोडा विचार करतां दिसून येण्यासारखें आहे.

सारस्वताच्या उर्वरित प्रकारांपैकीं, कादंबरी आणि महाकाव्य हे दोन प्रकार निराळे भासले तरी, हे स्थूलमानानें एकाच जातीचे आहेत. फरक हाच कीं, गद्यात्मक रचना असली कीं, कादंबरी म्हणावयाचें व पद्यात्मक रचना असली कीं

महाकाव्य म्हणावयाचें. लघुकथा व खंडकाव्य यांसंबंधींही असेंच म्हणतां येईल. म्हणजे, गद्यात्मक रचनेस लघुकथा व पद्यात्मक रचनेस खंडकाव्य, असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु, भावगीत हा सारस्वताचा प्रकार अगदींच निराळा मानावयास पाहिजे. कारण, भावगीत, हें आत्मभावनाप्रधान ( Subjective ) म्हणजे ज्यांत कवि आपल्या स्वतांच्याच भावना अथवा विचार चित्रित करीत असतो, असें असतें.

एकंदर लिखाणासंबंधींचा खालील आराखडा वाचकांस सुगम होईल म्हणून देत आहें.

**लिखाण** ( गद्यपद्यात्मक )

- वाङ्मय
  - साहित्य
    - कोश
    - व्याकरण
    - छंदःशास्त्र
  - ललित अथवा सारस्वत ( सुंदर व उदात्त )
    - वस्तुनिष्ठ (objective)
      - नाटक
      - कादंबरी अथवा महाकाव्य
      - लघुकथा अथवा खंडकाव्य
    - आत्मनिष्ठ (subjective)
      - भावगीत
      - आत्मचरित्र
  - शास्त्रीय वाङ्मय ( उ०—चरक, सुश्रुत, गणित, ज्योतिष, रसायन, भौतिक, इत्यादि शास्त्रें )
- किरकोळ व जुजबी. ( उ०—जाहिराती, निमंत्रण-पत्रिका, किरकोळ पत्रें वगैरे )

**भावगीत**

( स्वानुभवांवर व अवलोकितांवर कवीनें रचिलेलीं सुभाषितें, उद्गीतें, सूक्तें, लावण्या, इत्यादि त्याच्या स्वतांचे विचार-भावना-आकांक्षा द्योतक प्रकार )

| | |
|---|---|
| उदात्त ( Sublime ) उ० तुकारामांचे अभंग | सुंदर अथवा ललित (beautiful ) उ० जयदेव कवि, जगन्नाथ पंडित यांचें काव्य. |

आत्मनिष्ठ सारस्वत म्हणजे स्वतांच्या जीवनावर लेखकानें केलेली टीका, व वस्तुनिष्ठ सारस्वत म्हणजे, मानवी आणि समाजाच्या जीवनावर लेखकानें केलेली टीका होय. अर्थात्, व्यक्तीच्या मानसिक विकासांत उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचा परामर्श आत्मनिष्ठ सारस्वतांत घेतला जातो. या दृष्टीनें विचार करतां, तुकाराम व रामदास यांची कांहीं कविता आमनिष्ठ सारस्वताचा उत्तम नमुना आहे, असें आपणांस आढळून येईल. त्याचप्रमाणें, जॉन बनियनचें "पिल्ग्रिम्स् प्रॉग्रेस" हें पुस्तक आणि लक्ष्मीबाई टिळक यांनीं लिहिलेलीं स्मृतिचित्रें आत्मनिष्ठ सारस्वताचे उत्तम नमुने होत.

उलट, वस्तुनिष्ठ सारस्वतांत सामाजिक प्रश्नांचा खल केला जातो. अर्थात्, हें सारस्वत प्रोपगँडिस्ट म्हणजे प्रचारकी व हेतुप्रधान असें असतें. तथापि, यालाही कांही अपवाद आहेत. उदाहरणार्थ, शेक्स्पियरचीं नाटकें वस्तुनिष्ठ सारस्वताचा उत्तम नमुना गणलीं जाण्यासारखी असलीं तरी, "त्रैगुण्योद्भवमत्रलोक चरितं नानारसं दृश्यते" या न्यायानें मानवतेच्या सार्वकालीन आणि सर्वत्र खऱ्या असणाऱ्या वैविध्यदर्शनाशिवाय त्या नाटकांत दुसरी तत्कालीन सामाजिक प्रचारकता कोणतीच नाहीं. टॉलस्टॉय, पुष्किन्, डोस्टोय्व्हस्की,

कुप्रिन, मॅक्झिम गोर्की इत्यादि रशियन सारस्वत सम्राटांच्या सारस्वतांतील प्रचारकतेपुढें, शेक्सपियरची प्रचारकता पासंगालाही पुरणारी नाहीं. तथापि, वस्तुनिष्ठ सारस्वतांतील उत्तम नमुन्यांत त्याच्या नाटकांची गणना करण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं.

वस्तुनिष्ठ सारस्वतांतील उत्तम नमुने आपणांत, आपटेद्वय, वा. म. जोशी, डॉ. केतकर, फडके, माडखोलकर, खांडेकर, विभावरी शिरूरकर, गडकरी, वरेरकर, खाडिलकर इत्यादि लेखकांनी लिहून ठेवले आहेत. तथापि, या लेखकांपैकीं सामाजिक दृष्ट्या, कुणीं, कितपत व कशाचा प्रचार केला, हा प्रश्न अत्यंत मनोरंजक आहे! सारांश, वस्तुनिष्ठ वाङ्मयाचें मूल्य, केवळ त्याच्यांतील प्रचारकतेवरच असत, असें नाहीं. प्रचारकता ही उपयुक्ततेवर अवलंबून आहे आणि कला ही उपयुक्ततेची बटीक नसून तिची एक हिताची सखी आहे.

असो. भावगीतांत कवीच्या व्यक्तित्वास ( personality ) अधिक वाव असतो. उलट, नाटक, कादंबरी, लघुकथा या प्रकारांत कवीच्या म्हणजे सारस्वतनिर्मात्याच्या विशिष्ट दृष्टिकोणास वाव असला तरी, त्याच्या स्वतःच्य व्यक्तित्वास वाव नसतो, हें मागें सांगितलेंच आहे.

तसेंच, भावगीत या प्रकारांत कल्पकतेस वाव नसतो. पण नाटक, कादंबरी, लघुकथा या प्रकारांत कल्पकतेस चांगलाच वाव असतो. किंबहुना, कल्पकतेशिवाय, या रचना-प्रकारांत कलेच्या दृष्टीनें उत्कर्ष साधतां येणार नाहीं. उलट, केवळ कल्पकतेवर रचिलेलीं भावगीतें बेगडी होतील! भावगीतें अत्यंत अलंकारयुक्तही असूं नयेत, असें ओघानेंच म्हणावें लागतें. कारण अलंकारांचें अधिष्ठान कल्पकतेवर आहे. अर्थात् हें सर्व विवेचन स्थूलमानानेंच गृहीत धरावें. असले भेद परस्परविरोधी असूं शकत नाहीत. तथापि सारस्वतांतील, प्रत्येक प्रकारासंबंधीं शास्त्रीय व चिकित्सक दृष्ट्या विवेचन करावयाचें म्हणजे, कांहीं नियम, मर्यादा, व्याख्या, विवक्षित शब्दसंकेत, इत्यादि गोष्टी तर्कदृष्ट्या ठरवाव्याच लागतात. आणि प्रत्येक प्रकारासंबंधीं

एक वेगळेंच तंत्र ( technique ) निर्माण व विकसितही करावें लागतें. अर्थात्, या तंत्राचा उपयोग सारस्वत समीक्षकांस अधिक होय !

भावगीतांचें ३ रें प्रमुख लक्षण म्हणजे, त्याचा आटोपशीरपणा. कारण, " प्रबल व क्षुब्ध मनोवृत्तींचे स्वयंस्फूर्तीनें वाहूं लागणारे ओघ " (spontaneous overflow of powerful feelings ) अल्प काळच टिकणारे असतात, आणि वृत्तीचा हा जिव्हाळाच, किंवा जिव्हाळ्याची ही वृत्ति किंवा तळमळच, किंवा हे कवीच्या स्वतःच्या अंतर्मनाचे उमाळेच, भावगीताचा आत्मा होत ! The high seriousness of absolute sincerity असें मॅथ्यू आर्नोल्ड जें म्हणतो तें याच अर्थानें. भावगीतांचें ४ थें महत्त्वाचें लक्षण म्हणजे, त्याचें वैचित्र्य, अथवा त्याची विविधता. भावगीतांत कवीच्या व्यक्तित्वाचें प्रतिबिंब ( reflection of personality ) हमखास उमटत असतें, हें मागें सांगितलेंच आहे. आणि व्यक्ति तितक्या प्रकृति, या न्यायानें दोन चेहऱ्यांप्रमाणें दोन मनें देखील कधीही एकसारखी नसतात. मातृवंशीय व पितृवंशीय गुणधर्म अथवा आनुवंशिकता, बाह्य परिस्थिति, आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाच्या क्षणांचा झालेला बरा वाईट विनियोग, स्वार्थांधता, अथवा त्यागी-वृत्ति, इच्छाशक्तीची बलाबलता, श्रद्धायुक्त अंतःकरण, ज्ञानग्रहणशक्ति, भावनात्मकतेचें आणि संस्कारक्षमतेचें प्रमाण इ० इ० अनेक गोष्टींवर व्यक्तित्व अवलंबून असतें. सख्ख्या दोन बंधूंतच काय, पण जुळ्या भावंडांच्या स्वभावांत देखील, सर्वच बाबतींत साम्य मुळींच असूं शकत नाहीं. आणि याचें कारण, शास्त्रज्ञांसही पूर्णपणें कळलेलें नाहीं. पूर्व आणि पुनर्जन्म मानून, कर्माचें प्रारब्ध, ( स्वेच्छा, अनिच्छा अथवा परेच्छा,) संचित, क्रियमाण इ. प्रकार गणून, हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न पौर्वात्य तत्त्ववेत्ते करीत असतात. अमूक कृति अमूक वेळीं आपले हातून कां घडली व आपल्या आयुष्यास विशिष्ट वळण कां व कसें लागलें, हें ज्याचें त्यानेंच पाहिलें म्हणजे, आपणांस असेंच दिसून येतें कीं, बहुतेक प्रसंगीं, " जानामि धर्मं नच मे प्रवृत्तिः

जानाम्यधर्मं नच मे निवृत्तिः " असाच अनुभव प्रत्येकास आलेला असतो. तात्पर्य, मानवांतील वैचित्र्याची मिमांसा नीटपणें लागलेली नाहीं, असेंच म्हणावेंसें वाटतें. मानवामानवांतच काय, पण प्रत्येक व्यक्तींत, निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळें स्वभाववैचित्र्य प्रत्ययास येतें, आणि म्हणूनच, एकादी व्यक्ति पूर्णपणें वाईट, अथवा पूर्णपणें चांगली, अशी आपणांस आढळून येत नाहीं; तर व्यक्तीचा चांगुलपणा अथवा वाईटपणा हा सामान्यतः आणि सापेक्षतयाच ठरवावयाचा असतो. मनोविश्लेपणशास्त्रानें मानवाच्या स्वभावांतील वैगुण्यादिकांच्या कारणांसंबंधींची उपपत्ति बरीच लाविली आहे. तथापि, या विषयांत अज्ञात असें " कांहीं तरी " राहिलेंच आहे, आणि त्या " कांहीं तरी"ची उपपत्ति पूर्व–पुनर्जन्म आणि संचित–प्रारब्ध–क्रियमाण इत्यादि मानल्याशिवाय, समाधानकारक लागत नाहीं. अखिल विश्वामध्यें सूक्ष्मांत सूक्ष्म असणारा, आणि चराचरांत भरलेला, धन आणि ऋण कणयुक्त असा जो अणु आहे, त्यांतील धनकणाभोंवतीं ऋण कण जे फिरत असतात, ते सूर्याभोंवतीं ग्रहमाला जशी फिरते, त्याप्रमाणें फिरत असतात, असें भौतिक व रसायन शास्त्रज्ञ सांगतात. परंतु, हे ऋण कण प्रत्येक वेळीं एकाच तऱ्हेनें फिरतात किंवा हालचाल करतात, असें नाहीं ! मग मनुष्यप्रवृत्तीसंबंधीं तर विचारावयासच नको. कारण तो बुद्धिप्रधान आहे. आपल्या वैशिष्ट्यांसबंधीची मीमांसा चोर देखील लावीत असतो; ( इव्हन दि थीफ हॅज हिज् ओन फिलॉसफी ) आणि असत् प्रवृत्तीचे लोक ( दि डेव्हिल कॅन क्वोट स्क्रिप्चर फॉर हिज् पर्पज, या न्यायानें ) आपल्या कुकर्माचें समर्थन अभिनिवेशानें करीतच असतात. उलट, सत्प्रवृत्तीचे लोकही आपल्या कार्यासंबंधीं तितकेच आग्रही असतात. प्रवृत्ति आणि निवृत्ति, व स्वातंत्र्य आणि बंधन या मानवी जीविताच्या चतुःसीमा आहेत, हें मागें सांगितलेंच आहे. एकाद्याच्या व्यक्तित्वाचें मूल्य ठरविण्यासही, याच गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात. अत्यंत कामासक्त मनुष्य सुवृत्त महात्म्याच्या दृष्टीनें कामविकाराच्या बंधनांत कोंडलेला एक लाचार पशूच असतो. तथापि उपभोग घेण्याचें स्वातंत्र्य पूर्णपणें

अनुभविलें, अशी शेखी तो कामासक्त मनुष्य प्रौढीनें मिरवीतच असतो ! म्हणजे एकाद्याची प्रवृत्ति दुसऱ्याची निवृत्ति असूं शकते. आणि या प्रवृत्ति–निवृत्तीवरच, स्वातंत्र्य व बंधन यासंबंधींच्या त्याच्या कल्पना अवलंबून असतात. त्यागी वृत्तीचे रामकृष्ण परमहंस स्वतांला मनानें अत्यंत स्वतंत्र समजत असत. पण, भोगी वृत्तीच्या लोकांच्या दृष्टीनें रामकृष्ण परमहंस म्हणजे, स्वतांवर स्वतःच घातलेल्या अनेक निर्बंधांत अडकलेले दिसत असतील !

व्यक्तित्वाचा विचार करतांना, सत्प्रवृत्ति व असत्प्रवृत्ति यांविषयीं विचार ओघानेंच करावा लागला. आणि या विचाराशीं संलग्न नवमतवाद आहे म्हणून त्यासंबंधींही येथें थोडा विचार करणें क्रमप्राप्तच आहे. त्याविषयीं सारस्वत गुणैक दृष्टीनें माझे विचार पुढें मांडतों.

सदसत्प्रवृत्तींशी संलग्न गुन्ह्याची प्रवृत्ति आहे, आणि गुन्ह्याची प्रवृत्ति ही आर्थिक विषमतेमुळें उत्पन्न होणारी आहे. म्हणून, गुन्ह्याची प्रवृत्ति कमी करण्यासाठी, मानव्यांतील आर्थिक विषमता घालवून टाकली पाहिजे. ही विषमता घालविण्यासाठी, वित्त आणि वनिता यांचेवर कोणाचाही वैयक्तिक मालकी हक्क असूं देऊं नये, असें नवमतवाद्यांचें म्हणणें आहे. ( आपल्याकडील शाक्तपंथाचीं मतेंही जवळ जवळ अशींच आहेत. ) तात्पर्य, स्वैरसंभोग, म्हणजे बलात्कार नव्हे, पण राजीखुषींचे संभोग विहित धरावे. अर्थात्, नीति नीति म्हणतात ती मानवनिर्मित असल्यामुळें तिचें स्तोम माजवूं नये. म्हणजे, शासनकर्ते जे असतील, त्यांनीं यासंबंधींचे कायदे समूळ बदलून टाकावेत; संततिनियमनाचा अवलंब करीत जावा, आणि झालेल्या संततीचें परिपालन राष्ट्रानें करीत जावें; आर्थिक विषमता घालविण्यासाठीं भांडवलशाही समूळ नष्ट करावी. ही विषमता भांडवलवाल्यांनींच उत्पन्न केली. आणि मालकी हक्काचे संरक्षणार्थ नीतीचें बुजगावणेंही, पण त्यांनींच उत्पन्न केलें. शेतकरी व कारखान्यांत राबणारे मजूर लोक यांचें साह्य घेऊन, केवळ दलालीचें काम करून गबर होणाऱ्या

भांडवलवाल्या लोकांचा नायनाट करावा, आणि संपत्तीची विभागणी समतेच्या दृष्टीवर करावी, म्हणजे बहुतांचें बहुत कल्याण ( Greatest good of the greatest number ) होईल, असें नवमतवाद्यांस वाटतें. समाजाच्या असल्या व्यवस्थेनें मनुष्या-मनुष्यांमधील स्वार्थमूलक द्वेष, मत्सर, असूया इ. भावनांचा व समरप्रसंगाचा अथवा कलहकाण्डाचा नायनाट सहजच होऊं शकेल. तसेंच, अनेक जातींचें एकीकरण होईल. अर्थात्‌च, जातीजातींतील वैमनस्यें नाहींतशीं होऊन, व्यक्तीव्यक्तींत अधिक सलोखा व प्रेम राहील. आणि राष्ट्राची एकंदर कार्यक्षमता वाढून, त्याची एकसारखी भरभराट होऊं शकेल.

असली वसुधैवकुटुंबकप्रवृत्ति व स्थिति (Universal Brotherhood) खरोखरच अत्यंत कमनीय व लोभनीय आहे. आणि तत्त्वज्ञान देखील या वृत्तीची तरफदारीच करतें. मात्र ती हिंदुस्थानांत तरी, व्यवहारांत केव्हां व कशी आणतां येईल, हें ठरविणें कठीण आहे. Go back to Nature असा आदेश सुटतांच, हिंदुस्थानांतील एकंदर जनता म्हणजे हिंदु, मुसलमान, पारसी, यहुदी, खिस्ती, शीख इ. समाज समतेचा अवलंब करील, अशी आजची तरी स्थिति नाहीं. कारण, राजकीय, धार्मिक, भौगोलिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या हा प्रश्न अत्यंत बिकट व गुंतागुंतीचा असा आहे. तथापि, या दृष्टीनें प्रयत्न करणेंही क्रमप्राप्तच होईल, असें म्हणावेंसें वाटतें. कारण, दिवसेंदिवस, जीवनार्थकलह कठीण होत चालला आहे. आणि, वाहनांच्या सुलभतेमुळें आणि इतर यांत्रिक सुखसोयींमुळें, पाश्चात्य संस्कृतीच्या कल्पना आपल्याकडे झपाट्यानें प्रसृत होत आहेत. स्त्रीचें समाजांतील स्थान, जातीजातींतील उच्चनीचता इ. सामाजिक बाबतींत महत्त्वाच्या घडामोडी चालत आहेत. एकत्र कुटुंब-पद्धति नामशेष झालेली आहे. चूल व मूल, येवढेंच स्त्रियांचें क्षेत्र उरलेलें नसून, पुरुषांच्या बरोबरीनें त्या सर्व क्षेत्रांत सुप्रतिष्ठितपणें भाग घेत आहेत. सारांश, आजपर्यंत स्त्रीजातीची, दायादांची, व ब्राह्मणेतर जातींची जी सामाजिक कुचंबणा बरींच वर्षें

झाली, तिची प्रतिक्रिया म्हणूनच कीं काय, नवमनवादाच्या कल्पना आपल्या समाजांत इतक्या जोमानें प्रसृत होत आहेत, आणि जागृति येऊन नवचैतन्य इतक्या जोमानें खेळत आहे कीं, पौर्वात्य संस्कृति, या धक्क्यामुळें बरीच खिळखिळी होत चालली आहे. आणि हें अत्यंत साहजिकच आहे. यांत अंधानुकरण असें फारसें नाही. हा कालाचा ओघच आहे. परिस्थितीचा हा प्रचंड लोंढा मार्गे परतविण्याचें सामर्थ्य आपल्या समाजांत अनेक कारणांमुळें उरलेलें नाहीं. असे परिवर्तनाचे लोंढे प्रत्येक समाजांत येत असतात. त्या वेळी परिस्थितीशीं तडजोड करणेंच शहाणपणाचें असतें. व्यक्तिच्या आयुष्यांत सुद्धां, परिस्थितीशी तडजोड करण्याचे प्रसंग अनेक वेळां येत असतात. आणि तिचें बलाबल पाहून आपण तिच्याशीं तडजोड करीतच असतों. Life is a series of strifes and compromises हें खरेंच आहे.

परंतु, विचारवंतांपुढें प्रश्न जो उरतो, तो हाच कीं, ज्या आर्थिक विषमतेमुळें आणि पारतंत्र्यामुळें, ब्राह्मण आणि तत्सम जातींतील वैवाहिक बंधनें जाचक झालीं आहेत असें वाटतें, ती आर्थिक विषमता आणि तें पारतंत्र्य, वैवाहिक बंधनें अत्यंत शिथिल करून, किंबहुना, काढून टाकूनही नाहींसें होईल, किंवा कसें ! यासंबंधी निश्चित असें अनुमान आज कांहींच बांधतां येत नाहीं. एवढें मात्र खरें की, स्त्रियांच्या वैवाहिक नीतीसंबंधींच्या कल्पना आतां साफ बदलत चालल्या आहेत ( पुरुष " बंधनांच्या पलीकडे " केव्हांच गेलेले आहेत) शिवाय, सारस्वतानें तरी, नीतीचा बोज कितपत ठेवावा, हा एक प्रश्नच आहे ! सारस्वत हें नीतिशास्त्र नसल्यामुळें नीतीची प्रतिष्ठा तें नेहमीच कां बाळगील ? मानवांतील पतनशीलतेविषयी सारस्वतानें अत्यंत सहानुभूतीचीच दृष्टि ठेवली पाहिजे.

तथापि, मनुष्याच्या ज्ञानाच्या कपाटांत नीतीस स्वतंत्र स्थान नाहीं काय ? येथें हा प्रश्नही विचारांत घ्यावयास पाहिजे. जिकडे तिकडे नीति, नीति, हे पडसाद ऐकूं येतात, यावरून, नीतीस स्वतंत्र मूल्य आहे, असें दिसतें. अगदीं

प्राचीनकाळीं, नीति नव्हती, असेंच आपणांस दिसून येईल. परंतु, मानवांची संख्या आणि त्यांचे समूह जसजसे वाढत गेले, तसतशी धर्माची व नीतीची आवश्यकता भासूं लागली. स्वतांच्या सुखासारखीच दुसऱ्यांच्याही सुखाची काळजी बाळगणें उपयुक्ततेच्या दृष्टीनें जरूरीचें भासूं लागलें. इतरांस उपद्रव दिल्यास, तसा तो त्यांचेकडून आपणांसही होईल, या भीतीनें, म्हणजे स्वार्थी हेतूमुळेंच, इतरांस उपद्रव न देण्याची कल्पना उद्भवली. आणि हळूं हळूं त्याग, अहिंसा, सत्य, अस्तेय, वैवाहिक पावित्र्य इत्यादि विषयक कल्पनाही विकसित होत चालल्या. पुढें पुढें तर उपयुक्ततेची दृष्टि नाहींशी होऊन, ज्ञानासाठींच ज्ञान, नीतीसाठींच नीति, धर्मासाठींच धर्म, ध्येयवाद असल्या कल्पनांचा फैलाव होत गेला ( आणि यांत उपहास करण्यासारखें कांहींच नाहीं. कलेसाठीं कला, असला अभिनिवेश, अथवा रेकॉर्डब्रेकिंगच्या कल्पना, माउंट एव्हरेस्टवर किंबहुना मंगळावर जाण्याच्या कल्पना आज नाहीं कां दिसून येत ! आणि त्या थोड्याशा अव्यवहार्य असल्या तरी, त्यांची हेटाळणी अगर टिंगल आपण थोडीच करतों ! ) आणि इतर शास्त्रें उत्पन्न होऊन वाढूं लागलीं. आत्यंतिक नीति कोणती, आत्यंतिक सुख कोणतें ही जिज्ञासा मानवामध्यें उत्पन्न झाली. इतर शास्त्रांप्रमाणेंच गणित-शास्त्रही वाढत होतेंच. गणितांतील शून्य, अनंत इत्यादि संबंधींच्या कल्पनांनीं देखील, नीति आणि आध्यात्मिक-शास्त्रांत कदाचित् ढवळाढवळ केलेली असेल ! कशी ती पहा. सुखोत्पत्तीसंबंधीं सामान्यतः आपणांस खालील तऱ्हेचें समीकरण मांडतां येईलः-

$$\frac{\text{फल}}{\text{अपेक्षा}} = \text{सुख}$$

म्हणजे अपेक्षेचें मूल्य शून्य असल्यास, सुखाचें मूल्य अनंत होऊं शकेल ! असलीं समीकरणें दोन चार देतां येतील. परंतु तीं सर्व आत्यंतिक स्वरूपाचीं असल्यामुळें, बरींचशीं अव्यवहार्य ठरतील. शिवाय मनुष्य म्हणजे कांहीं निर्जीव नव्हे ! निर्जीव यंत्रास देखील स्नेहाची आवश्यकता आहे. मग मनुष्यासंबंधी

तर विचारावयास नको. गणितशास्त्र तें गणितशास्त्र व जीवनशास्त्र तें जीवनशास्त्र.

असो. मानवी संस्कृतींत ध्येयवाद कसा उत्पन्न झाला, यासंबंधीं वर थोडक्यांत विचार केला. या विवेचनाचा उद्देश हाच कीं, नीतीचें नांव घेतलें न घेतलें तोंच, "जीर्ण झालेले, बुरसलेले विचार" असा शिक्का करून, जी कित्येकांकडून आजकाल हेटाळणी करण्यांत येते, तिच्यांत किती अडाणीपणा, किती अनार्यत्व, किती अशास्त्रीयता आहे, हें वाचकांस कळावें. किंबहुना, वसिष्ठ–विश्वामित्र, राम–रावण, धर्म-दुर्योधन, किंवा प्लेटो-ॲरिस्टॉटल, फ्राइड–ॲडलर, गणित व जीवनशास्त्र, ध्येयवाद–वास्तववाद इत्यादींचीं द्वंद्वें ही सनातन म्हणजे सार्वकालीन आहेत. "आहारनिद्राभयमैथुनंच सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम्" "नायमात्मा बलहीनेन लभ्यः" "जीवो जीवस्य जीवनम्" हेंही खरेंच आहे; तरी पण, वैवाहिक पावित्र्य ( अर्थात् स्त्रीचें आणि पुरुषाचें ), अहिंसा, सत्य, अस्तेय, शुचिता, इंद्रियनिग्रह, इत्यादि सद्वृत्तिही, व्यष्टि व समष्टिच्या विकासास अत्यंत उपयुक्त आहेत. कारण असल्या वृत्ति समाजाच्या व राष्ट्राच्या हितास्तव, स्वार्थाची आहुति देण्यास उन्मुख करणाऱ्या असतात. बुद्धि, बल, यश, धैर्य, निर्भयत्व, आरोग्य, वाक्पटुत्व, इत्यादींचा लाभ पुरुषास सहजासहजीं होत असतो काय ! अशी जर वस्तुस्थिति असती, तर महात्म्यांत आणि सर्वसाधारण मनुष्यांत कांहींच फरक राहिला नसता ! मानसिक तपाच्या सामर्थ्याची महती गावी तितकी थोडीच आहे. ध्येयनिष्ठेची उत्कटता समाजासाठीं राष्ट्रासाठीं स्वार्थाची आहुति देण्याची विलक्षण तळमळ, "मरेन पण ध्येयापासून ढळणार नाहीं" असली ओजस्वी आणि चिवट चिकाटी पुरुषास कशामुळें प्राप्त होऊं शकते ! मरायचें केव्हां तरी आहेच; परंतु, मी आपला उपयोग लोककल्याणास्तवच करीन, असलें असिधाराव्रत जगाच्या इतिहासांत किती जणांनीं स्वीकारलें होतें ! ज्ञानेश्वर, एकनाथ, शिवाजी, तुकाराम, रामदास, आगरकर, टिळक यांच्यासारखी लोककल्याणाची खरी तळमळ किती जणांनीं बाळगिली होती !

स्वैरसंभोग, अनिर्बंध रोटीबेटीव्यवहार विहित झाला तरी, सामुदायिक कल्याणासाठीं, एका विवक्षित अशा अत्युच्च पातळीत जीवन व्यतीत करणाऱ्या त्यागेंद्रांची समाजास मुळीच गरज नाहीं काय ? खावें, प्यावें व मौज करावी किंवा Discretion better part of valour हें प्रतिपादण्यासाठीं भाष्यांच्या भाष्यें लिहिण्याची खरीच गरज आहे काय ? हें तर आम्ही न शिकतांच करीत असतों ! म्हणजे अस्पृश्यता, पुनर्विवाह, घटस्फोट, हिंदुत्व टिकवून जाती नष्ट करणें इत्यादि सुधारणांच्या मी विरुद्ध आहें, असें मला म्हणावयाचें नाही. समाज-स्थैर्याच्या दृष्टीनें कालानुसार सर्व गोष्टी इष्टच आहेत. परंतु, सचगोलंकार झाला तरी, भाषा, प्रांत, धर्म, राष्ट्र, या भेदांच्या तटभिंती इतक्या कांहि उंच, मजबूत आणि चिरजीवी आहेत कीं, एकाद्या विशिष्ट समाजाच्या अस्तित्वासाठीं, स्थैर्यासाठी व समुन्नतीसाठी, प्रसंगविशेषी प्राणाहुति देण्याची तयारी सतत ठेवणाऱ्या त्यागेंद्रांची गरज, त्या त्या समाजास नेहमीच राहणार, हें सनातन असें सत्य आहे, यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं. लाखांत एक का असेना, शेंकडों वर्षांनंतर एकदांच का असेना, पण असले विलक्षण तळमळीचे आणि पराक्रमी त्यागेंद्र समाजास नेहमीच लागत जाणार, हें विसरून चालतां येणार नाही. कालपरत्वें नीति-कल्पना बदलत नसतात, असें मला मुळींच म्हणावयाचें नाहीं. मनुष्यमात्रांतील पतनशीलता आणि समाजांतील गुन्हेगारीची प्रवृत्ति कधींच नाहीशी होणारी नाहीं. कारण, ही प्रवृत्ति मूलतःच मनुष्यमात्रांत आहे. तुरुंगांतील कैदी तर गुन्हेगार असतीलच; परंतु समाजांत, गुन्हे करूनही, संपत्तीच्या अगर अन्य बळावर उजळ माथ्यानें फिरणारे शिष्ट असतातच ! बलहीन दिसला की त्याला लुबाडावें, ही प्रवृत्ति मूळचीच आहे. ही प्रवृत्ति, ही स्पर्धा, हा स्वार्थ नैसर्गिक आहे. तिचा संपूर्ण नायनाट, धर्मशास्त्राच्या चाडांनी, नीतिशास्त्राच्या परिशीलनानें, अथवा कायदेकानूंनी देखील, होण्यासारखा नाहीं. स्वातंत्र्य-समता-बंधुता यांची शिकवण एकमेकांनीं एकमेकांस सांगण्यापुरतीच आहे. स्वतांवर येऊन टेपलें कीं, अनेक लटपटी सुचूं लागतात. मानवी जीवितांतील लढ्याचें सार,

विग्रहवादाचें सार हेंच आहे. आणि म्हणूनच, समाज आणि राष्ट्र जिवंत राहण्यास (दुबळे चिरडले जाऊं नयेत म्हणून, आणि त्यांनाही सबळ होण्यास वाव मिळावा म्हणून) बंधनें नसण्यापेक्षां, तीं असणेंच युक्त होय. आणि कांहीं तरी बंधनें हीं राहणारच. अर्थात्, ही नीतिअनीतिविषयक द्वंद्वयुद्धें मनुष्याच्या, समाजाच्या आणि राष्ट्रांच्या जीवनांत नेहमींच चालत राहणार. परंतु वस्तुस्थिति आणि ध्येयसृष्टि निराळी असली तरी, ध्येयाजवळ वस्तुस्थिति आणण्याची तळमळ विकासप्रिय मानव अहर्निश बाळगीत असतो. आणि ध्येयासंबंधांची ही उत्कट अभिलाषा व काल्पनिक ध्येयसिद्धि सारस्वतांत रंगवून आनंदलाभ करून घेण्याची खटपटही तो नेहमीच करीत असतो.

सारांश, नीति–अनीतीचा संबंध त्याग आणि भोग या द्वंद्वाशीं आहे. त्याग आणि भोग यांचा संबंध वित्त आणि वनिता यांच्याशी आहे. वित्त आणि वनिता यांचा संबंध व्यक्तीच्या, समाजाच्या आणि मानवी जीवनाशीं आहे आणि मानवी जीवनाचा संबंध सारस्वताशीं आहे. म्हणून नीति व अनीतीचा संबंध सारस्वताशीं आहे. तसेंच, कांहीं विशिष्ट असें ध्येय प्रत्येकास असतेंच म्हणून, सारस्वतांत ध्येयदृष्टीसही वाव आहे. ही काल्पनिक ध्येयदृष्टि सारस्वतांतच असते, असें नाहीं. शास्त्रीय विज्ञानाचे प्रांतांतही असलीं प्रमेयें (axioms) श्रद्धा–युक्त गृहीत धरलेलीं असतात उ० A point has no magnitude.

असो. अलीकडील नवमतवादांनीं मतें श्रद्धेला धक्का देणारीं आहेत, म्हणून त्यासंबंधी इतका ऊहापोह करावा लागला. परंतु, सारस्वतगुणैकदृष्टीनें मानवी जीवनाचा सामग्र्यानें विचार करतां, श्रद्धेसही सुंदर जीवनांत पुष्कळ वाव आहे, हें विसरतां येणार नाहीं. सर्व दृष्टींनीं विकासित जीवनच सुंदर असतें आणि आनंदोत्पादनासाठीं जीवनाचा असल्या सर्व दृष्टींनीच, सारस्वतांत विचार करणें युक्त असतें. म्हणजे Plato व Aristotle या दोघांच्याही तत्त्वज्ञानाचें अगम्य सारस्वतांत सारखेंच आहे. तथापि, त्यांतल्या त्यांत

विचार करतां, भोगानंदापेक्षां त्यागानंद अधिक श्रेष्ठ असतो. तसेंच, संभोगशृंगारापेक्षां विप्रलंभ आणि comedy पेक्षां tragedy अधिक परिणामकारक आणि आनंददायक असते, असें सामान्यतः प्रतिपादितां येईल. नाही तर, हुतात्म्यासंबंधीं पोवाडे गाण्याची प्रबल प्रेरणा सर्व राष्ट्रांत, सर्व भाषांत आणि सर्वकाली इतकी दिसून आली नसती. खऱ्या पुरुषास वीरवृत्तीचें महत्त्व केव्हांही झालें तरी, अधिकच वाटतें ! आणि या वृत्तीवरच त्यागवृत्ति अवलंबून आहे. विकृतमनस्क आणि भ्याडवृत्ति असलेल्या माणसास मात्र, त्यागानंद पटत आणि मानवत नाही. भ्याड मनुष्यच अधिक स्वार्थी असतो, असें आपणांस व्यवहारांतही नेहमीं दिसून येतें.

रामायणांत त्यागानंद पदोपदीं प्रत्ययास येतो, आणि म्हणूनच तें सर्वोत्कृष्ट काव्य आहे. त्यांतील प्रसंग जितके सुंदर आहेत, तितकेच ते धीरोदात्तही आहेत. रामाचा वनवास, लक्ष्मणाचें बंधुप्रेम, सीतेची पतिनिष्ठा, यांमधील त्यागसौंदर्य कांही अपूर्व आहे ! आणि यासंबंधीं नवल बाळगण्याचें कारण नाहीं. कारण, माणसकीचें परिमाण व मूल्य त्यागवृत्तिवरच अवलंबून आहे. विकासवादाच्या दृष्टीनें देखील पशुत्वाचें स्तोम सारस्वतांत माजविण्यापेक्षां, त्यागवृत्तीचें स्तोम माजविणेंच अधिक हितावह आहे.

परंतु, या सर्व विवेचनाचा निष्कर्ष हा नव्हे की, देहाची भूक, मोह, पतनसौलभ्य, भोगासक्ति इत्यादि भावना मी क्षुद्र मानतों. या सर्व भावना क्षुद्र तर नसतातच; पण उलट, त्या महत्त्वाच्या आणि प्रभावी अशा असतात. आणि म्हणूनच, गुन्हेगारांसंबंधीं मला अत्यंत सहानुभूति आणि दया वाटते. पण उद्वेग जो वाटतो, तो यासंबंधींच कीं, संयम आणि त्यागवृत्तीबद्दल एखाद्या लेखकानें, एखादेवेळीं जरी थोडी अनुकूलता दाखविली तरी, जुनेपणाचा, बुरुसलेपणाचा त्याच्यावर एकदम आरोप केला जाऊन, त्यास कित्येकांकडून अगदीं सळो कीं पळो केलें जातें; आणि आत्मोन्नतीचें ध्येय ठेवणाऱ्याच्या पदरीं ढोंगीपणा व फसवेपणा बांधला जातो, इतकेंच नव्हे तर, याच्या त्या लिखाणाची निर्भर्त्सनाही केली जाते !

असो. सारांश, त्याग आणि भोग या दोन तटांतून वाहणाऱ्या महाराष्ट्र सारस्वतनदौघांत आजपर्यंत ज्या लहान लहान नद्या मिसळलेल्या आहेत, त्यांत तत्त्वजिज्ञासा, नीति, विरक्ति, भक्ति, समर-प्रीति, स्त्रीरति आणि देशप्रीति या मुख्य नद्या आहेत, आणि आतां नवमतवादामुळें या प्रवाहांत, अध्यात्मिक दृष्ट्या नव्हे, पण लौकिक दृष्ट्या, म्हणजे कलहाचें मूळ जी वित्त ( वारुणी ) वनिता, तद्विषयक स्वतंत्रता, समता, बंधुता या नद्याही मिसळूं पहात आहेत.

नवमतवाद हा प्रचलित सामाजिक प्रश्न असल्यामुळें, त्याचे पडसाद वस्तुनिष्ठ सारस्वतांत उमटल्याशिवाय राहणार नाहींत. या वादामुळें सारस्वतविषयक एकंदर मूलभूत कल्पनाच आतां खिळखिळ्या होऊं लागल्या आहेत, असें भासलें तरी, विग्रहवादाचें, समर प्रसंगांचें अथवा कलहकांडाचें महत्त्व मानवी जीवनात, अतएव सारस्वतांत कधीही कमी होणार नाही, हें मात्र खरें. जगांतील यच्चयावत् सर्व भाषांतील सारस्वताचें आलोडन करितां आपणांस असेंच आढळून येईल कीं, वित्त आणि वनिता यांचे भोंवतींच संसृतीचा पिंगा नेहमीं चालत असल्यामुळें, सारस्वताची उभारणी, कोठें आणि केव्हांही झाली तरी, कलहकांडावरच झालेली असते ! मग हें कलहकांड व्यक्तीच्या भावनाभावनांत असो, अथवा व्यक्ती-व्यक्तींमध्यें अथवा राष्ट्राराष्ट्रामध्यें असो, किंवा नीतीसाठी, अगर विरुद्ध असो; कशीही वस्तुस्थिति असली तरी, सारस्वतांतील आस्वाद्यमानता कलहकांडावर अधिष्ठित असते, या म्हणण्यास बाध येणार नाही. कितीही समता साधली तरी, " तूं आणि मी " चें अस्तित्व राहणारच ! सोंगट्या, बुद्धिबळें, पत्ते यांचे एका अर्थी समरलालसेवर उभारलेले बैठे खेळ; अथवा, हुतुतु, आट्यापाट्या, क्रिकेट, हॉकी. टेनिस, फुटबॉल, इत्यादि मैदानी खेळ खेळून आनंद मानण्याची प्रवृत्ति अत्यंत नैसर्गिक आहे.

कलहकांडाशिवाय सुखविणाऱ्या इतर भावना सारस्वतांत असूं शकत नाहींत असें नाहीं. लढ्याशिवाय सुखविणाऱ्या ज्या भावना असतात, त्या अत्यंत कोमल व सात्त्विक अशा असतात. त्यागावर उभारलेलें

शुद्ध सात्त्विक प्रेम, वात्सल्य, बालमनाचें अकृत्रिम सारल्य, निष्कापट्य, दया, क्षमा, शांति, सहानुभूति इत्यादि उदात्त भावना देखील सजीव सारस्वत निर्माण करण्यास समर्थ असूं शकतात. कारण सौंदर्याबरोबरच उदात्त भावना-ही सुसंस्कृत मनास अत्यंत सुखप्रद असूं शकतात किंवा उदात्ततेंतही सौंदर्य असतें, असें म्हटलें तरी चालेल.

दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी मोठी गोष्ट अशी कीं, चांगलें आणि खरें, यांचाच जगांत नेहमीं जय होत नसतो. Survival of the fittest या न्यायानें जगांत नेहमीं बलवानांचाच जय होत असतो. तथापि, सर्वांनीच समबल असावें हा सृष्टीचा हेतु नाहीं आणि म्हणूनच सृष्टींत वैषम्य व नैर्घृण्य नेहमींच दिसून येतें. याचे कारणांसंबंधी येथें ऊहापोह करणें अप्रस्तुत आहे. वैषम्य व नैर्घृण्य निर्माण करून विधात्यानें जणूं काय, एकंदर सृष्टीचेंच सारस्वत केलें आहे, येवढें मात्र खरें. वैषम्य व नैर्घृण्य यांमुळेंच सुख व दुःख या द्वंद्वाचें अस्तित्व आहे. आणि सुखदुःखाच्या अस्तित्वांनच मानवी जीवितांचें स्वारस्य व खुमारी आहे. जीवितांत स्खलनशीलता, कलहकांड, वैषम्य, नैर्घृण्य, जरा आणि मरण इ. आहेत म्हणूनच काव्य आहे. आणि या काव्यसौंदर्यांत भविष्याच्या आपल्या अज्ञानानें आणि गेलेले क्षण पुन्हां हातीं येत नसल्यामुळें, पुष्कळच भर पडली आहे. म्हणजे, मानवाला पृथ्वीवरील स्थलांतील अंतर जलद काटतां आलें तरी, अद्यापि, विश्वाची अर्थात् कालाची गति कमीजास्त अगर उलटसुलट करतां येत नाहीं. आणि भविष्य काळीं अमूक व्यक्ति, अमूक वेळीं, अमूक स्थळीं, अमूक तऱ्हेनेंच वागेल, याविषयीं सामान्य अनुमान बांधतां आलें तरी, निश्चित असें कांहीच सांगतां येत नाहीं. शिवाय, निसर्गानें स्त्रीवर लादलेली गर्भधारणेची जबाबदारीही विचारांत घ्यावयास पाहिजे. स्त्रीपुरुषांतील हा मुख्य भेद अत्यंत महत्त्वाचा आहे. स्त्री नाजूक असली तरी सहनशील, प्रेमळ, चिरंतन प्रेम करणारी, स्थिर मनाची अशी सामान्यतः असते. आणि म्हणूनच कीं काय,

विधात्यानें, गर्भधारणेचें हें जोखमीचें काम तिच्याकडे सोंपविलें आहे! असो. भौतिक शास्त्रांची कितीही वाढ झाली, सामाजिक सुधारणा कितीही झाली तरी, उपरिनिर्दिष्ट परिस्थिति कधीही नाहींशी होणार नाही. अनुभवांवर उभारलेल्या अनेक आशा, आणि त्यांची परिपूर्त, संकल्प व सिद्धि यांचे लपंडाव, विरह व संगम यांमुळेंच जीवितास वैचित्र्य व हृदयंगमता ही लाभली आहेत. अंतःकरणांत वावरणाऱ्या विविध भावना–सुंदरी आपले रमणीय विलास, हट्ट, रुसणें, हास्यमय लास्य, कानगोष्टी, तसेंच आपलें सत्यप्रेम, दुष्टशासन व शिष्टपरिपालन यांविषयींची आपली आवड इत्यादि गोष्टींनीं जीवराजाचे जीवनाचा आनंद क्षणोक्षणीं वाढवीत असतात.

मानवाला जीविताचें प्रेम अपार आहे, हें मागें सांगितलेंच आहे. भणंग भिकारी, अपंग, जराजर्जर, अशा लोकांसही जगावेंसें वाटतें! जगण्याच्या या इच्छेंतच बुभुक्षा व कामेच्छा सामावली जाते. भिकाऱ्याच्या भिक्षांदेहि वृत्ती-पासून तों तहत राज्यक्रांत्यांच्या उलथापालथीपर्यंत या बुभुक्षेचाच प्रादुर्भाव आपणांस प्रत्ययास येतो. तसेंच, ब्राह्मविवाहाला आधारभूत असणाऱ्या सात्त्विक भावनेपासून, स्वैरसंभोग या प्रेरणेपर्यंतच्या रतिविषयक सर्व विविध व संकीर्ण भावना मूलतः नैसर्गिक अशा कामेच्छेवरच आधारलेल्या असतात. या दोन प्रेरणांइतकीच कृतिप्रेम व क्रीडासक्ति या प्रेरणाही अत्यंत स्वाभाविक असतात. परंतु, सृष्टींतील वैषम्य व नैर्घृण्य यांमुळें उपरिनिर्दिष्ट प्रेरणांस पदोपदीं अडथळे येत असतात. आणि म्हणूनच चिकीर्षेप्रमाणेंच मानवास विजिगीषा ही असते. मग तो प्रसंगविशेषीं न्यायान्यायाकडेही पहात नाहीं. आणि म्हणून, त्याग आणि भोग, सुख आणि दुःख या द्वंद्वांप्रमाणेंच, सारल्य आणि पैशुन्य या द्वंद्वाचे विहारही मानवी जीवनांत आपणांस नेहमींच आढळून येतात.

तात्पर्य काय कीं, जीवन म्हणजे एक मोठा कलह आहे। "रात्रंदिस आम्हां युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन" असें जें तुकारामा

म्हणतात, त्यांत जीवनव्यापाराचें सर्व सार सांठवलेलें आहे. जीवनांतील हे लढे व्यक्तीव्यक्तीमध्यें जसे असतात, त्याचप्रमाणें व्यक्तीच्या अंतःकरणांतील विरोधी भावनांमध्येंही असूं शकतात. या लढ्यांमुळें उत्पन्न होणाऱ्या खळबळीचें आविष्करण म्हणजे सारस्वत. गु. प्रो. पोतदार यांची व्याख्याही अशीच आहे. " थोर मनाच्या खोल खळबळीचें गोड आविष्करण " अशी त्यांनीं सारस्वताची व्याख्या केली आहे. पाश्चात्यांची कल्पनाही अशीच आहे. The concrete and artistic depiction of the various emotions created by disputes of diverse and complex nature either within man's inner life, cr between man and man-between hero and villain, असेंच सारस्वतासंबंधी इंग्रजींत म्हणतां येईल. याविषयीं मागेंही थोडेंसें विवेचन केलें आहे. म्हणजे, जीवनांतल्या या विविध प्रकारच्या लढ्यांमुळें मानसिक प्रवृत्तीवर पडणाऱ्या दडपणामुळें जे अनेक बरे वाईट परिणाम होत असतात, व भावना–कामना–वासनापूर्तीमध्यें जे कधीं कधीं अनेक अडथळे उत्पन्न होतात; त्यामुळें प्रतिक्रिया म्हणून मूळ प्रवृत्तीचें एका अर्थानें वक्रीभवन, परावर्तन, परिवर्तन व कधीं कधीं वर्धनही होत असतें. स्थायी भावनांचें असें वक्रीभवन, परावर्तन, परिवर्तन व उदात्तीभवन ( Sublimation ) होऊं लागलें म्हणजे, रसांची उत्पत्ति होऊन सारस्वतांत सौंदर्य प्रतीत होतें. Literature is escape from life, या म्हणण्याचा अर्थही हाच.

असो. मानवी जीवितासंबंधीं बराच विचार केला गेला. परंतु, हा सामाजिक क्रान्तीचा काळ आहे म्हणून, याविषयीं कितीही विचार केला तरी, मनाचें समाधान होण्यासारखें नाहीं. पण, यापेक्षां अधिक विचार करणें अप्रस्तुत आहे, म्हणून आतां भाषेसंबंधीं थोडासा विचार करूं. कारण भाषा ही सर्व लिखाणाचा देह आहे. कविकुलगुरु कालिदास यानें वाक् आणि अर्थ, यांविषयीं, एक सुंदर श्लोक लिहून ठेवला आहे, तो असाः—

**वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।**
**जगतः पितरौ वंदे पार्वतीपरमेश्वरौ ॥**

ही उपमा, अथवा हिच्यापेक्षां भव्य आणि समर्पक उपमा दुसऱ्या कोणा-सच सुचूं शकली नसती! पार्वती आणि परमेश्वराचा अभेद्यसंबंध दर्शविण्यासाठीं कालिदासास वागर्थाची उपमा सुचली. प्रकृति आणि पुरुष अथवा, matter आणि energy यांप्रमाणेंच वागर्थ देखील अभेद्य आहेत. म्हणजे, भाषा म्हटली कीं अर्थ हा आलाच. वाचमर्थोऽनुधावति, या म्हणण्याचा अर्थही हाच. तसेंच कांहीं अर्थ मनांत अभिप्रेत असला की, भाषा ही आलीच. Thinking is mental talk असें जें म्हणतात, तें याच अर्थानें. अर्थात्, उत्तम सारस्वतनिर्मितीस भाषेचें उत्तम ज्ञान आवश्यक आहे. मायबोलीचें सम्यग्ज्ञान करून घेणें म्हणजे, अद्यतन ज्ञान–प्राप्तीबरोबरच, पूर्वसंस्कृतीचा अभ्यास करणें अगत्याचें होय. शब्दांचे वाच्यार्थ, लाक्षणिक आणि व्यंग्यार्थ ध्यानांत येण्यास मनोविकास आणि पूर्व वाङ्मयाचें ज्ञान अवश्यच आहे. वेदवाङ्मया-पासून आजतागाईतच्या "कळ्यांचे निश्वास", "हिंदोळ्यावर", "विरलेलें स्वप्न" या पुस्तकांपर्यंत अभ्यास करायचा म्हणजे आपल्या संस्कृतीच्या ज्ञानप्रधान आणि आचारप्रधान अंगाच्या फेरबदलांचा अभ्यास करणें होय. अद्यतन ज्ञानाबरोबर भूतकाळाची आठवणही वाङ्मय थोडी फार करून देत असतें. आणि जोंपर्यंत ही आठवण राहण्याचीं साधनें उपलब्ध आहेत, तोंपर्यंत ही आपली बदलणारी पण एक विशिष्ट संस्कृति आयुष्मती आहे, असें आपणांस म्हणतां येईल. शरीरांत प्रत्येक क्षणाला अक्षरशः बदल होत असला तरी, १२ वर्षांपूर्वी जो मी होतों, तोच मी आजही आहे. म्हणजे, अद्यतन–ज्ञानग्रहण–क्षमतेबरोबरच माझ्या भूतकाळाची स्मृतिही मला आहे. परंतु, एकाद्या संस्कृतीच्या भूतकाळाच्या ज्ञानाचीं साधनें जेव्हां अनुपलब्ध असतात, आणि, वर्तमानकालीं जेव्हां तिचें अस्तित्व नसतें, तेव्हां ती संस्कृति नामशेष झाली, असें आपण म्हणतों. उदा-हरणार्थ, बॅबेलोनियन, इजीप्शियन, सुमेरियन संस्कृति. पण, आर्यसंस्कृति बदलली तरी, जिवंत आहे. बदल होणें, हें तर जिवंतपणाचें लक्षण आहे. बदल झाला तरी पूर्वस्मृति कायमच असते. आर्यसंस्कृतीचेंही तसेंच आहे. सारांश, भूतकाळासंबंधीं अज्ञान बाळगणें, म्हणजे संस्कृतीला पूर्णपणें न जाणणेंच होय.

असो. भाषा आणि भाषेंतील वाङ्मय, सारस्वत आणि साहित्य जिवंत राहिलें म्हणजे स्मृतिरूपानें पूर्वसंस्कृतीचें आचार-प्रधान नसलें तरी विचार-प्रधान अंग जिवंत राहतें, हें खालील उदाहरणांवरून दिसेल.

**यावत्तैलं तावदाख्यानम्**–तेलाचे दिवे व कीर्तन ही संस्था कदाचित् कालांतरानें नष्ट होईल. परंतु, भाषेंत ही म्हण जोंपर्यंत कायम आहे, तोंपर्यंत स्मृतिरूपानें यांचें अस्तित्व राहणारच !

**विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करणें**–पुढें श्राद्ध कोणीच करणार नाहींत, असें आपण मानूं. परंतु स्मृतिरूपानें या विधीचें अस्तित्व राहाणारच.


**विधवेला कुंकवाची उठाठेव**–पुढें विधवा कुंकू लावूं लागतील, अथवा विधवा व सधवाही कदाचित् कुंकू लावणार नाहीत! परंतु या म्हणीचा अर्थ कायमचा राहील.

**गुडघ्याला बाशिंग**–या म्हणीसंबंधीही असेंच म्हणतां येण्यासारखें आहे.

तात्पर्य, उत्तम भाषाज्ञान करून घ्यावयाचें म्हणजे पूर्वग्रंथांचें अर्थात् पर्यायानें 'पूर्वसंस्कृतीचें' उत्तम ज्ञान करून घ्यावयास पाहिजे आणि उत्तम सारस्वत-निर्मितीस उत्तम भाषा-ज्ञानाची तर जरूरी आहे. अर्थात् पूर्वसंस्कृतीचा परिणामही आत्मनिष्ठ सारस्वतांत तरी थोडा फार होणारच, हें निराळें सांगावयास नको. किंबहुना, एकंदर जीवितासंबंधींच्या उदात्त, उच्च, विस्तृत, व्यापक, सखोल, तलस्पर्शी, मूलग्राही, अशा त्रिकालाबाधित उत्कर्षक कल्पनांवरच एकंदर सारस्वताच्या मोलाची महती अवलंबून आहे. जीविताविषयींच्य असल्या कल्पनांमुळेंच भाषेचें ऐश्वर्यही वृद्धिंगत होतें. जीवितज्ञान एका अर्थी त्रिकालालाही पुरून उरणारें आहे. त्याचप्रमाणें सारस्वतही त्रिकालाला पुरून उरणारें आहे. पूर्वकालीन छटा सारस्वतांत उमटत असतातच. परंतु, त्यांत वर्तमानकालीन प्रचलित प्रश्नांचा परामर्शही घेतला जातो. इतकेंच नव्हे, तर भविष्यकालीन परिस्थितीसंबंधीं सुंदर मनोराज्यें देखील सारस्वतांत चित्रित केलीं जातात. वास्तविक, सारस्वताचा जीविताशीं संबंध, वस्तूच्या छायेचा वस्तूशीं जो असतो, त्याप्रमाणेंच असतो. तरी पण उत्तम सारस्वत इतकेंच ऊर्जस्वल असतें की, तें एखाद्याचें जीवितही बदलूं शकतें !


प्रभावी भावनांच्या आंदोलनांनीं निर्माण झालेलें सारस्वत प्रभावी भावनाही निर्माण करूं शकतें, आणि प्रसंगीं कर्तव्य करण्यास धैर्य व उत्साह आपणांस मिळूं शकतो, याचा अनुभव अनेकांस आहेच. उलट, हीन सारस्वताचा परिणामही मनावर हीनच होतो.

भाषेच्या परिपोषास, सारस्वताच्या सौंदर्यास, आणि जीविताच्या साफल्यास नुसत्या भूतकालाच्या ज्ञानाचीच आवश्यकता आहे, असें नसून एका विशिष्ट अर्थानें त्रिकाल ज्ञानाचीही जरूरी आहे. यासंबंधींचें अधिक स्पष्टीकरण येथें करतों.



या सर्व विवेचनाचा निष्कर्ष हाच कीं, वाङ्मयाचे प्रांतांत जीवित, भाषा व काल यांचें मूल्य सारखेंच मानावें लागतें. म्हणजे, उत्तम जीवित होण्यास जीवितांविषयींच्या सर्वांगीण व उत्तमोत्तम कल्पना असाव्या लागतात. आणि उत्तम कल्पना अवगत होण्यास उपरिनिर्दिष्ट रीतीनें भाषाज्ञान व त्रिकालज्ञानही आवश्यक आहे.

खाली दिलेल्या आकृतीनें यांचे परस्परसंबंध नीट ध्यानांत येतील.




व्यक्तीच्या बाबतींत उपयोगी होणाऱ्या या त्रिकालज्ञानाच्या कल्पनेचें विशदीकरण खालीं लिहिल्याप्रमाणें करतां येण्यासारखें आहे.

( १ ) संग्राहक मन, म्हणजे sub-conscious mind हें भूतकालांत मिळविलेल्या अनुभवांची व ज्ञानाची जपणूक करीत असतें.

( २ ) जिज्ञासू मन, म्हणजे conscious mind हें वर्तमानांत एकसारखें अवलोकन करून ज्ञान मिळवीत असतें.

( ३ ) ध्येयनिष्ठ आकांक्षायुक्त मन भविष्यकाळाकडे दृष्टि ठेवून सर्वांगीण समुन्नतीसाठी धडपडत असतें.

व्यक्तीचा विकास होण्यास या तिन्हीही मानसिक शक्तींचें प्राबल्य व प्राचुर्य आवश्यक आहे.

वास्तविक, हे असले भेद सापेक्षनया व चर्चेसाठींच घेतलेले आहेत. कारण, मानवाची जी मूलभूत प्रवृत्तिविषयक प्रगति होत आहे, ती एका सरळ रेषेंतच होत आहे, व जेथून तो निघाला, तिकडे तो कधीच जाणार नाहीं, असें निखालसपणें म्हणतां येणार नाही. " History repeats itself " हें बऱ्याच अंशीं खरें आहे. नाकासमोर सरळ रेषेंत जर एकादा मनुष्य चालावयास निघाला, तर तो पृथ्वीप्रदक्षिणा करून पुन्हां पूर्वपदावर येणारच. पृथ्वीच काय पण एकंदर विश्व देखील एका मोठ्या चेंडूसारखें आहे. किंबहुना, सत्याला अधिक जवळ असें विवेचन करावयाचें झाल्यास, आपणांस असेंच म्हणावें लागल कीं विश्वचक्राची एकंदर गति ऱ्हीयमाण आहे. म्हणजे, त्याची गति नुसती वर्तुलाकार नसून ती Spiral आहे. " The available energy of the Universe grows steadily less " ( 2 nd law of Thermodynamics उष्णयामिकाचा २ रा नियम ) या भौतिकशास्त्रज्ञांच्या म्हणण्याचा अर्थही हाच. येथें सांगावयाचा मुख्य मुद्दा हाच कीं, शास्त्रीयज्ञान कितीही वाढलें, आणि सामाजिक जीवन कितीही उन्नत आणि सुखी झालें तरी, मानवांतील कलहप्रीति ही कायमच राहणार ! अर्थात्, मानसिक व आध्यात्मिक उन्नति, अत्यंत उच्च व उदात्त अशी ध्येयदृष्टि ठेविल्याशिवाय होणार नाहीं. इतकेंच नव्हे तर, सामाजिक आंदोलनें, राष्ट्रीय घडामोडी, राजकीय उलाढाल्या, या चक्रनेमिक्रमाप्रमाणें नेहमींच होत राहणार !

आणि म्हणूनच, सारस्वतांत नवीनता विशेष नसतेच, असें एका अर्थानें म्हणतां येण्यासारखें आहे. आणि थोडीफार जी नवीनता असते, ती सामग्र्यानें ग्रहण करावयाची झाली तरी, पुराणें जें आहे, तें सर्वच्या सर्व एकजिनसी त्यागिलें पाहिजे, असें नव्हे. विश्वरचनेचें सम्यग्ज्ञान होण्यास Riemannian भूमितीची उपयुक्तता पटूं लागली तरी, Euclid च्या भूमितींतील तत्त्वांना केव्हांही एकदम हरताळ फासला जाणार नाहीं, हेंहि तितकेंच खरें आहे. जुन्यानव्याचा रमणीय संगम सर्व चराचर सृष्टीत अविरत चालू आहे. किंबहुना, जुन्यानव्यांतील बाचाबाच्या ज्या उत्पन्न होतात, त्या संकुचित दृष्टीमुळेंच होत असतात, असें विचारांतीं दिसून येईल.

यावरून कोणी असें मात्र समजूं नये की, प्राचीन आणि अर्वाचीन काळांत कांहीच भेद नाहीं. आगगाड्या, आगबोटी, तारायंत्रें, मोटारी, विमानें, रेडिओ, टेलिव्हिजन इत्यादि आधुनिक शास्त्रीय शोध पूर्वी होतेच, असा माझ्या प्रतिपादनाचा अर्थ नाहीं. हे सर्व शोध नवेच आहेत; व या शोधांमुळें वैयक्तिक, सामाजिक, आणि मानवी जीवनावर अनेक भलेबुरे परिणाम झालेले आहेत. तसेच सारस्वत प्रकारांच्या शैलींतही बदल झालेले आहेत. तरी पण, बुभुक्षा, कामेच्छा, कलह इत्यादि स्थायी भावनांत, हजारों वर्षें झालीं तरी फारसा फरक झालेला नाहीं. आणि आज सुखसाधनें वाढलीं असली तरी, जीवनार्थकलह देखील पूर्वीच्या मानानें तितकाच तीव्रतर झालेला आहे.

आणि म्हणूनच, विश्वज्ञानोन्मुख अशा विकास-प्रवण दृष्टीला, वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, इत्यादि भोग व सुखविषयक संकुचित प्रश्नच नेहमीं विलोभनीय असावेत, आणि तादितर, त्यागावर उभारलेले व्यापक प्रश्न बहिष्कृत असावेत, अशी संकुचित दृष्टि ठेवणें, म्हणजे असीम अशा ज्ञानानंदास आणि कलेच्या आनंदास मुकणेंच होय.

चराचरांतील सौंदर्यदिग्दर्शन करून असीम आनंदाची अभिवृद्धि व खैरात करणें, हें कलेचें कार्य आहे. परंतु, तिला उपयुक्ततेची बटीक करून, केवळ

प्रचलित सामाजिक प्रश्नांसंबंधींच अगर विरुद्ध ऊहापोह करावयास लावणें अयुक्त होय. प्रचलित समाज विषयांखेरीज असे मानवजीवनविषयक व विश्वविषयक इतर अनेक व्यापक प्रश्न असूं शकतात, कीं जे सारस्वतांत आणि वाङ्मयांत ग्रथिले जाऊन भाषाप्रांतकालभेदातीत असा परमोच्च आनंद देऊं शकतात. आणि म्हणूनच, "इंदू काळे व सरला भोळे" या कादंबरीप्रमाणेंच किंबहुना अधिकच प्रो. वामनरावांची "रागिणी" आनंद-दायक आहे.

मात्र, मानवी जीवनांत कलेचा मुळींच उपयोग नसतो, असा अर्थ या विवेचनाचा घेऊं नये. उपयुक्ततेच्या दृष्टीनें, नीति आणि बोधवादापासून तों कुटुंबविध्वंसक आर्थिक व लैंगिक समतावादापर्यंतच्या सर्व छटा सारस्वतांत उमटूं शकतात. परंतु आनंदप्रद सौंदर्यास मूर्तता देण्याचें कलेचें जें वैशिष्ट्य आहे, तें सतत राखलें गेलें पाहिजे, हा मुख्य मुद्दा आहे.

रसिक आणि सुसंस्कृत मनास "ओलेतीचें" चित्र तर आवडेलच, पण एकवस्त्रा स्थितींत असलेल्या द्रौपदीस भर सभेंत ओढून आणून तिला दुःशासन विवस्त्र करीत असतांना तिची झालेली केंविलवाणी स्थिति दाखविणारें चित्रकारानें काढलेलें चित्रही तसेंच आवडेल. रसिक मनास, चित्रित केलेली अभिसारिकाही आवडेल व अशोक वनांतील दीन सीताही आवडेल. तसेंच,

**"अडकाठि तुला जिवलगा रे केली कोणी**
**ये दिवसां नवऱ्यावाणी"**

या ओळी प्रमाणेंच,

**"पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे**
**टेंकुनि ती जनता शीर्षावर जग उलथुनिया देऊं कसे!"**

या ऊर्जस्वल ओळीही खऱ्या रसिकास आवडल्याशिवाय राहणार नाहींत.

असो. या दृष्टीनें विचार केल्यास, सारस्वतांतील जुनेपणा अथवा नवीनपणा क्लासिकल व रोमँटिक हे भेदही, निदान आत्मनिष्ठ सारस्वतांत तरी, सापेक्षच मानावयास पाहिजेत. म्हणजे आज जें लिखाण क्लासिकल वाटतें, तें पूर्वी रोमँटिक होतें, व आजचें थोडें फार रोमँटिक लिखाण उद्यांला क्लासिकल होणार. The poetry of one generation becomes the philosophy of the next generation या विधानाचा अर्थही हाच. किंबहुना, अद्यतनज्ञानग्रहण-क्षमतेबरोबरच एखाद्या कवीला पूर्वसंस्कृतिज्ञानही असूं शकतें. आणि यामुळें त्याचें लिखाण तत्त्वज्ञानप्रधान, अभिजात अथवा लौकिक, असें असूं शकतें. उदाहरणार्थ, नीतिप्रेम, वैराग्य, ईशभक्ति या अभिजात भावना व देशाभिमान ही लौकिक भावना, एकाच मनांत असूं शकतात, असें दाखवितां येईल. कारण, मनोविकासाचे क्षेत्रास सीमा नाहीं. आणि म्हणूनच, वेदांतील काव्यस्थलें, रामायण-भारतांतील काव्यस्थलें, कालिदास, भवभूति, शेक्सपियर यांचीं नाटकें, ज्ञानेश्वरी, तुकारामाचे अभंग, जगन्नाथ पंडित अथवा हाफिज, सादी, उमरखय्याम यांचें काव्य, गडकरी यांचीं नाटकें, तांबे, माधव ज्यूलियन यांचें काव्य, आणि प्रो. वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्या, स्थूलमानानें पाहतां सारख्याच लोभनीय आहेत. जुन्या नव्याचा भेद सारस्वतांत व वाङ्मयांत तरी सापेक्षच आहे. किंबहुना, एका अर्थानें " व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम् " असेंही म्हणावयास हरकत नाहीं.

**" तीं तीं पदें नित्य फिरोनि येती।**
**त्या त्याच अर्थाप्रति दाविताती "॥**

हें खरेंच आहे. पण निरनिराळ्या सारस्वत कृतींत पृथगात्मता व नाविन्य जें दिसून येतें, तें निर्मात्याच्या दृष्टिकोणामुळें व व्यक्तित्वामुळेंच असतें. आणि म्हणूनच वरील ओळींपुढें

**आत्मनुभूतीस महत्त्व आहे।**
**सत्काव्य तेणें नव वाटताहे ॥**

असें मला लिहावेंसें वाटतें. म्हणजे भाषेपेक्षां देखील लेखकाच्या दृष्टिकोणाचें

अथवा व्यक्तित्वाचें महत्त्व सारस्वतांत अधिक आहे. आणि ज्याच्या त्याच्या वैशिष्ट्याप्रमाणें ज्याची त्याची कलाकृति वस्तुनिष्ठ वा आत्मनिष्ठ, ध्येयवादी अथवा वास्तववादी असते.

असो. जीवित, सारस्वत, भाषा, काल, इत्यादि विषयींचीं माझी मतें येथपर्यंत दिली. आतां, प्रत्यक्ष माझ्या कवितांविषयी कांहीं लिहून ही लांबलेली प्रस्तावना आटोपती घेतों. माझ्या आयुष्यांत भावनांचे प्रमाथी झंझावात अनेक वेळां सुटलेले आहेत. म्हणजे स्टॉर्म अँड स्ट्रेसचे प्रसंग अनेक वेळां आलेले आहेत. किंवा, भावनांच्या प्राबल्यामुळें कित्येक वेळीं साधे प्रसंगही मला आणीबाणीचे भासले असतील! तें कसेंही असो, पण मनाच्या असल्या अस्वस्थतेंत व असंतोषांत सहज स्फुरलेल्या या माझ्या कवितांनीं मला पुष्कळच शांति व सुख दिलें, आणि माझी एकंदर कार्यक्षमता वाढली. कलेसाठीं कला, असला अभिनिवेश माझेजवळ नाहीं. मायबोलीची सेवा करावी, इतकी योग्यताही नाही. मनाची तळमळ शांत व्हावी, हाच मूळचा हेतु असला तरी, वेळोवेळीं मीं लिहिलेल्या या कविता सर्वस्वीं बुद्धिपुरःसर अथवा लोकांच्या चालनेनें लिहिलेल्या नाहींत. पद्यांत असें मला फारसें लिहितां येत नाहीं. परिस्थितीवर जय मिळविण्यासाठीं चाललेल्या माझ्या निष्फळ धडपडींच्या पोटींच माझ्या कवितांतील, कित्येक कवितांचा उगम झालेला आहे.

या कविता स्फुरत असतांना, तरल, शुद्ध, सात्त्विक, उच्च, निरतिशय व निरपेक्ष असा आनंद मला वेळोवेळीं झालेला आहे. त्या त्या वेळीं मी सविकल्प समाधीचा आनंद, किंबहुना विगलितवेद्यांतरत्व अनुभवलें आहे, असें मला म्हणतां येईल! मूळ, स्वतांसाठींच रचिलेल्या या कविता आहेत. परंतु, वाचकांत जी आत्मौपम्य बुद्धि असते, तिजमुळें त्यांनाही या कविता वाचून आनंद होण्याचा संभव आहे; म्हणून, या प्रसिद्ध केल्या जात आहेत. भावगीतांत वैचित्र्यास फारच वाव असतो, आणि म्हणूनच, सहानुभूति असणारे समानधर्मे फारच थोडे आढळून येतात. तथापि, स्वत्व व सत्त्वप्रदर्शनाचे सात्त्विक व प्रतिष्ठित असे जे मार्ग आहेत, त्यांत सारस्वतसेवेचा मार्ग सर्वश्रेष्ठ आहे, असा

विचार करून, हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास प्रवृत्त झालों. त्याची अवहेलना झाल्यास मनाला खंत वाटण्याचें कारण नाहीं. कारण, मोठ्या प्रथितयश सारस्वतसेवकांची देखील, त्यांचे हयातींत समकालीनांकडून अनास्था झालेली आहे आणि हें तर बोलून चालून भौतिक युग आहे. " नोच्चार्थी विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्तु कामो लघुः " हें ब्रीद ठेवण्यांतही यशच आहे.

ध्येयप्राप्तीची धडपड, पण दूर दूर धांवणारें ध्येय, आणि त्यामुळें होणाऱ्या दुःखाची प्रचीति, यांमुळें हळुवार अंतःकरणांत कवितेचे निष्यंद पाझरतात-आणि मग दुःखाचा उपशम होतो, असा मला अनुभव आला आहे

" आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा, कल्पनेचा, भावनेचा व ध्येयांचा परिपाक " काव्यांत उतरावा, असें माधव ज्यूलियन् म्हणतात. तसा तो माझे कवितांत उतरला आहे, असें मला वाटतें. दोन्हींहि गुच्छांतील कवितांचा आस्वाद वाचकांनीं साकल्यानें व एकपिंडतेच्या दृष्टीनें घ्यावा, म्हणजे त्यांन त्यांत अंतःकरणाचा जिव्हाळा, चटकदारपणा, सहजता, आटोपशीरपणा, साधेपणा, वेधकता, सूत्रवत् अर्थबाहुल्य, भावनांची व विचारांची व्यापकता उच्चता, विविधता, उत्कटता ( intensity ) इत्यादि भावगीताच्या गुणांपैकीं कांहीं गुण तरी दिसून येतील, अशी मला आशा आहे.

एखाद्या वस्तुतत्त्वाच्या अंतरंगासंबंधी रासायनिक ज्ञान करून घ्यावयाचें म्हणजे त्याच्या घटनेंतील प्रोटोन्स व इलेक्ट्रोन्सची व्यवस्था व परस्परसंबंध जसा लक्ष्यांत घ्यावा लागतो, अथवा, फोर्ड अथवा ऑस्टिन मोटरगाड्यांच्या पूर्ण माहितीसाठीं त्यांमधील यंत्ररचनेचें ज्ञान जसें आवश्यक आहे, त्याचप्रमाणें, भावगीतें लिहिणाऱ्या लेखकाच्या मनाचें शास्त्रदृष्ट्या केलेलें विश्लेषणही वाचकांस माहीत असणें अगत्याचें आहे, म्हणून इतका ऊहापोह केला.

जातींचें एकीकरण, अस्पृश्यतानिवारण, घटस्फोट, इत्यादि अनेक सामाजिक प्रश्नांचा परामर्श; आर्थिक विषमतेसंबंधींच्या भावना; अथवा, निसर्गावर गाइलेलीं गीतें, गूढगुंजनें इत्यादि प्रकार या कवितेंत फारसे नाहींत, म्हणूनही

कित्येक नाराज होतील. परंतु भावगीतांचें पुस्तक म्हणजे ज्ञानकोश अथवा समाजशास्त्र नव्हे, असें मला त्यांना सांगतां येईल. भावगीतांनीं लेखकाचें व्यक्तिदर्शन झालें, म्हणजे लेखकानें आपली कामगिरी चांगली बजावली, असें म्हणतां येईल.*

तसेंच, गायनाच्या वर्चस्वाचे आहारींही मी आपली कविता जाऊं दिली नाहीं, म्हणूनही कित्येक गायक कवि मजवर रुष्ट होतील. काव्यक्षेत्रांत गायनाचें वर्चस्व असूं नये असें मला वाटतें. या मतास अनुकूल असें मत प्रो. रा. श्री. जोग व श्री. माधव ज्यूलियन् यांचेंही आहे. ( त्यांचे, अनुक्रमें आधुनिक काव्यप्रकाश, व " गज्जलांजलि " हे ग्रंथ पहावेत. )

असो. तूर्त, नवमतवादास मी अनुकूल नसलों तरी, मी मानवांतील पशुत्वाची अवहेलना करतों, असें नसून, या पशुत्वाची जाणीव मलाही चांगलीच आहे. मनुष्य स्वभावतः पतनशलि आहे, हें मी कबूल करतों, आणि म्हणूनच इतक्या शृंगारपर कविता मीं प्रस्तुत गुच्छांत संग्रहित केल्या आहेत. जीवनशास्त्र, मानसशास्त्र यांच्या दृष्टीनेंच नव्हे, तर समाजशास्त्राच्या दृष्टीनें देखील कित्येक प्रसंगीं, लैंगिक अनीति क्षम्य असली तरी, नवमतवादाचीं सर्व मतें तूर्त प्रयोगावस्थेंतच आहे, हें सुज्ञांनीं लक्ष्यांत घ्यावें, अशी त्यांना विनंति आहे; तसेंच Every saint has a past and every sinner his future हेंही सर्वांनी जाणावें. या नियमास सारस्वतसेवक म्हणजे अपवाद् असतात, असें नव्हे! तेही स्खलनशील

* "Poetry is neither a means of ethical instructions, an after dinner amusement, nor the lawful play of snobs and dilettanti."

"It ( poetry ) brings one face to face with a human personality, not with a dictionary and a commonplace book."

—RICHARD ALDINGTON.

असतात, हें आपणांस अनेक उदाहरणांवरून दिसून येईल. वाल्मीकि हा लुटारू होता. सूरदास वेश्यासक्त होता. तुकाराम संसारविन्मुख होते. जगन्नाथ पंडितांनीं तर एका यवनींचे पायीं धर्मही सोडला होता! तथापि, त्यांनीं निर्मिलेल्या सारस्वताची आस्वाद्यमानता कशी काय नाहींशी होणार? उलट सारस्वतांत केवळ लैंगिक भावनांचें स्तोम तरी कसें काय माजवितां येणार? **केवळ लैंगिक भावनांचा विलास म्हणजेच सारस्वत, अशी जी कित्येकांची समजूत होत चालली आहे, ती अनिष्ट व अशास्त्रीय आहे; व सारस्वतांत इतर उदात्त भावनाही विहार करूं शकतात, हेंच मला सांगावयाचें आहे.**

जे जात्याच रसिक आहेत, त्यांना खरें म्हटलें तर, विशेष सांगण्याची जरूरच नसते. किंवा, जे जात्याच अरसिक आहेत, त्यांच्यापुढें किती जरी विवेचन केलें तरी, ते रसिक थोडेच होणार आहेत! काश्मीरच्या नंदनवनांतील वनश्रीचें सौंदर्य व आर्द्रता सहारा वाळवंटास कशी काय येणार? तथापि, रसिकांना मात्र या प्राक्कथनाचा उपयोग वाटाड्यासारखा होईल, असें जाणून येवढें विस्तृत लिहिलें.

जा ऽ म—ए—उस्मानिया,
हैद्राबाद दक्षिण
विजया १० शके १८५८

श्री. वा. गाडगीळ

# समर्पण

आजचें वर्तमान व भविष्य,
उद्यांला, अनुक्रमें भूत व वर्तमान करणाऱ्या,
सर्वभक्षक, सर्वज्ञ, सर्वसाक्षी, इंद्रजालपटु,
चिरजीवी, आणि कराल अशा
कालपुरुषासही, ज्यांची
पवित्र आणि पावन स्मृति
नाहींशी करतां येणार नाहीं,
ते माझे
शिवस्वरूप पितामह,

**ती. स्व. कै. दामोदरपंत विष्णु**

ऊर्फ

**बापूसाहेब गाडगीळ,**

यांच्या आत्म्यास
हीं
**" माझीं फुलें "**
अत्यंत श्रद्धायुक्त अंतःकरणानें
अर्पिलीं आहेत.

## "माझीं फुलें गुच्छ २ रा" या पुस्तकांत छापिल्या जाणाऱ्या कविता.

( १ ) आत्मनिवेदन-- प्रथम मुद्रण काव्यरत्नावली मासिक
( २ ) ताईचें बाळ— „ „गृहलक्ष्मी मासिक
( ३ ) बदललेली मनःस्थिति--„ „ सद्विचार द्वैमासिक
( ४ ) प्रेमगुणगान— „ „ काव्यरत्नावली मासिक
( ५ ) प्रतिभाबाला
( ६ ) माझीं फुलें
( ७ ) मुग्ध कलिका
( ८ ) कविता-स्तोत्र
( ९ ) हरीचें वेड
( १० ) दारुण निराशा
( ११ ) बाह्य व अंतर
( १२ ) कवि-मानस
( १३ ) आर्त वाणी
( १४ ) हृद्कासारांतील काव्यसरोजें
( १५ ) चक्रव्यूहांत फसवणूक
( १६ ) प्रभूचा धांवा
( १७ ) जंबूकान्योक्ति
( १८ ) दया
( १९ ) वन्य सुख
( २० ) भीषण भव

( २१ ) कवितेस—प्रथम मुद्रण राजहंस मासिक
( २२ ) भग्न हृदय
( २३ ) सुखदशा हाय पुरी संपली-प्रथम मुद्रण सहविचार द्वैमासिक
( २४ ) केतकी
( २५ ) चंद्रमा—प्रथम मुद्रण New Poona College Magazine
( २६ ) काव्यतरंग— ,, ,, काव्यरत्नावली मासिक
( २७ ) आला, परंतु न कळे, परतोनि गेला !-प्रथम मुद्रण काव्यरत्नावली मासिक
( २८ ) कुंभकार
( २९ ) पंजरस्थ शुक
( ३० ) निद्रादेवीस--
( ३१ ) शिशुरंजन
( ३२ ) कवितेचे उपकार
( ३३ ) विरहिणी-प्रथम मुद्रण विहंगमाला
( ३४ ) यावीण काय मागूं !
( ३५ ) भक्त-वाणी
( ३६ ) जा विसरोनी गत सारें-प्रथम मुद्रण काव्यरत्नावली मासिक
( ३७ ) येथें व तेथें
( ३८ ) भवसागर
( ३९ ) कृतान्त
( ४० ) सत्कवींच्या कृति वाचून—
( ४१ ) कविता व हास्य
( ४२ ) सुख-स्वप्नीं—प्रथम मुद्रण राजहंस मासिक
( ४३ ) व्रजविहारी
( ४४ ) स्वच्छंदी कवी-प्रथम मुद्रण सहविचार द्वैमासिक
( ४५ ) मातृभक्त बाळें

( ४६ ) निंदूं कुणाला वेरें ?
( ४७ ) पाहुं नका हो, वळून—प्रथम मुद्रण यशवंत मासिक
( ४८ ) प्राणज्योति
( ४९ ) सुंदरीस—
( ५० ) कविमानसमंथन—प्रथम मुद्रण
( ५१ ) प्रभात— ,, ,,
( ५२ ) काव्येश्वरीस— ,, ,,
} काव्यरत्नावली मासिक
( ५३ ) माझा काव्याशीं परिचय ( गद्य ) प्रथम मुद्रण New Poona College Magazine
( ५४ ) बिंबभाव—प्रथम मुद्रण सह्याद्रि मासिक
( ५५ ) नाना न्या मज भूर !
( ५६ ) प्रथम परिचय–प्रथम मुद्रण राजहंस मासिक
( ५७ ) जीवित–कूट–,, ,, सहविचार द्वैमासिक
( ५८ ) समाधि
( ५९ ) नास्तिकांस—प्रथम मुद्रण सहविचार द्वैमासिक
( ६० ) बाला-केलि
( ६१ ) कालौघानेंच–
( ६२ ) प्रिया–दर्शन
( ६३ ) हुरहूर–प्रथम मुद्रण सहविचार द्वैमासिक
( ६४ ) मस्तानखां
( ६५ ) स्फूर्ति-निर्झर—प्रथम मुद्रण सहविचार द्वैमासिक
( ६६ ) बालिकेस
( ६७ ) रांगडें प्रेम
( ६८ ) रंभा शुक-संवाद
( ६९ ) कविता व प्रिया–प्रथम मुद्रण सहविचार द्वैमासिक
( ७० ) प्रिया-विरह

( ७१ ) .. रीत--प्रथम मुद्रण सहविचार द्वैमासिक
( ७२ ) वटवृक्ष व फुलवेल—,, ,, राजहंस मासिक
( ७३ ) सिंहावलोकन—प्रथम मुद्रण सहविचार द्वैमासिक
( ७४ ) रूपसम्राज्ञीस
( ७५ ) मानिनीस
( ७६ ) अबोला
( ७७ ) वंचना
( ७८ ) आयुष्यांतील वसंत—प्रथम मुद्रण सहविचार द्वैमासिक
( ७९ ) स्वराज्याचा लढा— ,, ,, राजहंस मासिक
( ८० ) वाचिक अहिंसा— ,, ,,
( ८१ ) विकायाचा न हा कांहीं !–,, ,,
( ८२ ) वर्षास्तिमितसुंदरी— ,, ,,
( ८३ ) नवपरिचित भगिनीस—,, ,,
} सहविचार द्वैमासिक
( ८४ ) निजामसागर
( ८५ ) महात्मा गांधी—प्रथम मुद्रण ज्ञानप्रकाश व सहविचार द्वैमासिक
( ८६ ) रुष्ट प्रियतमेस— ,, ,,
( ८७ ) पर प्रयाण-- ,, ,,
( ८८ ) सहचारिणीस— ,, ,,
( ८९ ) रुष्ट नाथांस-- ,, ,,
( ९० ) पौर्णिमेचा मध्यकाल ,, ,,
} सहविचार द्वैमासिक